www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

संपादक - संतोष शिवदास आमले

मुख्य संपादक - भारती आमले | उपसंपादक - श्री विलास गायकवाड | कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे | निवासी संपादक- श्री राकेश पाटील | सह संपादक - श्री मुकुंद कांबळे | महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे

वर्ष : 3 | अंक : ५० | बुधवार, दि. २९ ऑक्टोबर २०२५ | किंमत : ४ रु | पृष्ठ : ८ | RNI MAHMAR/2023/89514




## परतूर येथील रामकृष्ण रुग्णालयाचे डॉ.ज्ञानेश्वर शिंदे यांनी हृदयविकाराच्या झटक्यातून रुग्णाला सुखरूप आणले बाहेर



**दैनिक युवक आधार**
**परतूर -जालना (अशोक ठोके)**

ऐन लक्ष्मीपूजनच्या दिवशी पहाटे 3.00 च्या सुमारास कायमखानी परिवारातील जफर भाई यांना हृदय विकाराचा तीव्र झटका आल्यामुळे त्यांना रामकृष्ण रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. रुग्णालयाचे डॉ. ज्ञानेश्वर शिंदे यांनी लगेच जफर भाईंनाअतिदक्षता विभागात दाखल करून त्यांच्यावर तातडीने उपचार करण्यात आले. त्यांना रक्त पातळ होण्याचे इंजेक्शन देण्यात आल्यावर रुग्ण लगेच हृदय विकाराच्या झटक्यातून सुखरूप बाहेर आले,त्या बद्दल कायमखानी परिवारातील सर्व सदस्यांनी डॉ. ज्ञानेश्वर शिंदे व डॉ.निकिता शिंदे व रामकृष्ण हॉस्पिटलच्या सर्व कर्मचाऱ्यांचे आभार व्यक्त केले.

## खासदार निलेश लंके यांनी घेतली लोकनेते रामशेठ ठाकूर यांची सदिच्छा भेट



**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

रायगड जिल्ह्यासह पनवेल, उरण आणि इतर विभागाचा चेहरामोहरा विकासाच्या माध्यमातून बदलण्याचे कार्य लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी केले असून, रयत शिक्षण संस्थेच्या उभारणीत त्यांचा सिंहाचा वाटा आहे, असे गौरवोद्गार खासदार निलेश लंके यांनी काढले. खासदार निलेश लंके यांनी मंगळवारी पनवेल येथे लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. या भेटीदरम्यान दोघांमध्ये सामाजिक, शैक्षणिक विषयांवर सविस्तर चर्चा झाली. यावेळी खासदार निलेश लंके यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या समाजकार्यातील योगदानाचा उल्लेख करत त्यांच्या कार्यशैलीचे कौतुक केले.

# फेब्रुवारीमध्ये जागतिक स्तरावरील 'मुंबई क्लायमेट वीक'चे मुंबईत आयोजन - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा

### तीसहून अधिक देशांमधील अभ्यासक, पर्यावरण तज्ज्ञ, आणि धोरणकर्त्यांचा समावेश

**मुंबई :** वातावरणीय बदल आणि पर्यावरण संवर्धनाच्या क्षेत्रात भारताचे नेतृत्व अधोरेखित करणारी मुंबई वातावरण सप्ताह - 'मुंबई क्लायमेट वीक' ही जागतिक स्तरावरील परिषद पुढच्या वर्षी फेब्रुवारीमध्ये मुंबईत होणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

हा महत्त्वाकांक्षी उपक्रम 'प्रोजेक्ट मुंबई' या संस्थेच्या संकल्पनेतून साकारला जात असून महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण आणि वातावरणीय बदल विभाग आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सहकार्याने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. मंत्रालयातील समिती कक्षात आयोजित बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस यांनी या उपक्रमाची घोषणा केली. यावेळी पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या मंत्री पंकजा मुंडे, महापालिका आयुक्त भूषण गगराणी, विभागाच्या सचिव जयश्री भोज, प्रोजेक्ट मुंबईचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी शिशिर जोशी आदी उपस्थित होते.

विकसनशील देशांतील वातावरणीय बदल, अन्न व ऊर्जा टंचाईच्या पार्श्वभूमीवर हा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा ठरणार असून विकास आणि पर्यावरणीय कृती यांच्यात संतुलन साधण्यासाठी तो प्रभावी भूमिका बजावेल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला.

मुंबई क्लायमेट वीकचा मुख्य कार्यक्रम १७ ते १९ फेब्रुवारी, २०२६ या कालावधीत जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर, मुंबई येथे पार पडेल. त्याचबरोबर या कार्यक्रमात नागरिकांना सहभागी होता यावे, यासाठी शहरभर विविध प्रदर्शने, कार्यशाळा, चित्रपट, कला, क्रीडा, आरोग्य




आणि अध्यात्म यांच्याशी निगडीत उपक्रम, आणि क्लायमेट फूड फेस्टिव्हल सारखे कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

या परिषदेत ग्लोबल साऊथमधील ३० पेक्षा अधिक देशांमधील प्रतिनिधी सहभागी होणार असून यामध्ये व्यवहार्य असा हवामान बदल कृती कार्यक्रम तयार करण्यात येईल. विशेष म्हणजे हा कार्यक्रम राज्यांचे मुख्यमंत्री, विविध शहरांचे प्रतिनिधी, उद्योग, सामाजिक संस्था, विद्यार्थी आणि युवक यांच्या सहभागातून तयार करण्यात येणार आहे, अशी माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिली. यावेळी फडणवीस यांच्या हस्ते मुंबई क्लायमेट विकच्या लोगोचे अनावरण करण्यात आले. तसेच या उपक्रमाची चित्रफीत यावेळी दाखविण्यात आली.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मुंबई हवामान सप्ताह कृतीसह नेतृत्व करण्याच्या भारताच्या दृढनिश्चयाचे प्रदर्शन करतो. माननीय पंतप्रधानांनी ठरवलेल्या दृष्टिकोनातून प्रेरित होऊन, मुंबई आणि महाराष्ट्र जागतिक दक्षिणेसाठी न्याय्य, नाविन्यपूर्ण, चांगल्या निधीसह हवामान भविष्य घडवण्यास मदत करण्यास तयार आहेत.

ग्लोबल साउथमधील वातावरणीय कृती आणि सहकार्य या क्षेत्रामधील भारताचे नेतृत्व सिद्ध करणारे मुंबई क्लायमेट वीक हे मोठे व्यासपीठ ठरणार आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मुंबईत पहिल्यांदाच "मुंबई क्लायमेट वीक" कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहे. आता कृती करण्याची वेळ आली आहे.यासाठी आपण समाजातील प्रत्येक व्यक्तीला, प्रत्येक व्यवसायाला आणि जीवनाच्या सर्व स्तरांना हवामान बदलाच्या परिणामांविरुद्ध मोहिमेत सहभागी व्हावे लागणार आहे. तसेच त्यांना कृतींद्वारे बदल कसे कमी करायचे हे प्रत्यक्षात सांगावे लागणार आहे.

"मुंबई क्लायमेट वीक" कार्यक्रम आयोजित केल्यानंतर आपल्याला महाराष्ट्र आणि मुंबईसाठी बेंचमार्क देखील निश्चित करावे लागतील, हवामान बदलाच्या क्षेत्रात कृती करण्यासाठी काही ध्येये निश्चित करावी लागतील. त्यासाठी आजपासून कृती सुरू करूया असेही ते म्हणाले.तीसहून अधिक देशांमधील अभ्यासक, पर्यावरण तज्ज्ञ, आणि धोरणकर्ते मुंबई क्लायमेट वीकच्या व्यासपीठावर एकत्र येऊन वातावरणीय बदलावरच्या सर्वंकष आणि व्यवहार्य उपाययोजना शोधण्याचा प्रयत्न करतील. हा उपक्रम भारत आणि विकसनशील राष्ट्रांचा आवाज जागतिक स्तरावर पोहोचविणारा ठरेल, असेही ते म्हणाले.


मुंबई क्लायमेट वीकचा भर अन्न प्रणाली, ऊर्जा संक्रमण आणि शहरी सक्षमता या तीन प्रमुख विषयांवर असेल. न्याय, नवोन्मेष आणि वित्तीय दृष्टीकोनातून हे विषय सखोलपणे मांडले जातील.'प्रोजेक्ट मुंबई'चे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी शिशिर जोशी यांनी कार्यक्रमाबद्दल माहिती देताना सांगितले की, "मुंबई क्लायमेट वीक हा महाराष्ट्र आणि भारतासाठी एक ऐतिहासिक टप्पा असणार आहे. वातावरणीय बदलाला तोंड देण्यासाठी लोकसहभागावर आधारित असे शाश्वत आणि समावेशक उपाय या परिषदेतील मंथनातून तयार होतील."

या उपक्रमाचे नॉलेज पार्टनर मॉनिटर डिलॉईट असणार असून क्लायमेट ग्रुप, इंडिया क्लायमेट कोलॅबोरेटिव्ह, वर्ल्ड रिसोर्सेस इन्स्टिट्यूट (इंडिया), एव्हरसोर्स, एचटी पारेख फाउंडेशन, युनिसेफ, शक्ती फाउंडेशन, रेनमॅटर फाउंडेशन, नॅशनल गॅलरी ऑफ मॉडर्न आर्ट आणि राष्ट्रीय सेवा योजना यासारख्या संस्था यात सहभागी होणार आहेत.मुख्यमंत्री कार्यालयातील यांचे अपर मुख्य सचिव अश्विनी भिडे, सचिव डॉ.श्रीकर परदेशी, मुख्यमंत्र्यांचे मुख्य आर्थिक सल्लागार कौस्तुभ धवसे, प्रोजेक्ट मुंबईचे सल्लागार मंडळ सदस्य रिधम देसाई, जलज दाणी आदी यावेळी उपस्थित होते.

## सहा फ्लाइट्स.. १६२३ प्रवाशांची ने-आण; नाशिक विमानतळाचा विक्रम

**दैनिक युवक आधार**
**नाशिक**

'एकाच दिवसात सहा फ्लाइट्सच्या माध्यमातून तब्बल १६२३ प्रवाशांची ने-आण करून नाशिक विमानतळाने आगळावेगळा विक्रम नोंदवला आहे. रविवारी ७९३ प्रवाशांना नाशिक येथून इतरत्र नेण्यात आले, तर इतर ठिकाणांहून ८३० प्रवासी नाशिक विमानतळावर दाखल झाले. रविवारच्या या 'फ्रिक्वेन्सी'ने स्थानिक विमानतळावर गेल्या ७ जून रोजी नोंदवलेला १३३४ प्रवासी संख्येचा विक्रम मोडीत काढला.गेल्या काही महिन्यांपासून नाशिककर विमान प्रवासाला पसंती देत असल्याचे प्राप्त आकडेवारीवरून अधोरेखित झाले आहे. वेळेची बचत आणि सुखकर प्रवासाचे गणित यामुळे साध्य होते. विशेषतः, मुंबई, दिल्ली, बंगळूरू आदी शहरांत जाणाऱ्या नाशिककर प्रवाशांच्या संख्येत लक्षणीय वाढ होत आहे. चालू आठवड्यापासून नाशिकहून जाणाऱ्या फ्लाइट्सच्या




संख्येत वाढ होणार असल्याची माहितीही पुढे आली आहे. त्यामुळे येथे प्रवाशांच्या संख्येत वाढ होत असल्याचे दिसते.नाशिकहून दिल्लीला जाणाऱ्या प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेता इंडिगो कंपनीने रविवारपासून दिल्लीसाठी दुसऱ्या फ्लाइटचा श्रीगणेशा केला. उद्योग-व्यवसाय क्षेत्रांतील व्यक्तींना सोयीस्कर व्हावे, यासाठी नाशिकहून दिल्लीसाठी रात्री ८.५० वाजता फ्लाइट निघणार असून दिल्लीहून नाशिकसाठीच्या प्रवासाची वेळ सायंकाळी ६.२० वाजताची असणार आहे.

## फाळके पुरस्कार घोटाळ्याच्या चौकशीला स्थगिती; तक्रारदाराला न्यायालयाची नोटीस; ७ नोव्हेंबरला होणार पुढील सुनावणी

**दैनिक युवक आधार**
**मुंबई**

दादासाहेब फाळके पुरस्कार घोटाळ्याशी संबंधित गुन्ह्याची अधिक चौकशी करण्यास उच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे. माजी स्पॉटबॉय अनिल मिश्रा व त्यांच्या मुलाने गुन्हा रद्द करण्याची विनंती करीत न्यायालयात धाव घेतली. त्यांच्या याचिकेवर मुख्य न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठाने तक्रारदाराला नोटीस बजावली आणि पुढील सुनावणी ७ नोव्हेंबरपर्यंत तहकूब ठेवली.

अनिल मिश्रा व त्यांच्या मुलाने दादासाहेब फाळके यांच्या नावाचा गैरवापर करून बनावट चित्रपट पुरस्कार सोहळा आयोजित केल्याचा आरोप आहे.



या प्रकरणी वांद्रे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तो गुन्हा रद्द करण्यासाठी मिश्रा पिता-पुत्राने उच्च न्यायालयाचे दार ठोठावले आहे. दादासाहेब फाळके आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव या नावाखाली पुरस्कार सोहळ्याचे आयोजन केले होते. त्यात गैरव्यवहार करण्यात आल्याच्या आरोपावरून वांद्रे पोलिसांनी अनिल मिश्रा आणि त्यांच्या मुलाविरुद्ध गुन्हा दाखल केला.

मिश्रा पिता-पुत्राने हा कार्यक्रम सरकार-प्रायोजित पुरस्कार सोहळा म्हणून खोटे चित्र उभे केले आणि चित्रपट कलाकारांना उपस्थित राहण्याचे आमंत्रण दिले. तसेच महोत्सवाची विश्वासार्हता वाढविण्यासाठी राष्ट्रपती, पंतप्रधान आणि वरिष्ठ केंद्रीय मंत्र्यांचे फोटो आणि बनावट पत्रे वापरल्याचाही गंभीर आरोप आहे.

याप्रकरणी भाजप फिल्म असोसिएशनचे राज्य अध्यक्ष समीर दीक्षित यांनी वांद्रे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

न्यायालयाने तक्रारदार दीक्षित यांना मिश्रा पिता-पुत्राच्या याचिकेवर उत्तर सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.


## दिल्ली-दुबई विमानप्रवासात झुरळाला 'फाशीची शिक्षा'!; एअर इंडियाची 'कारवाई' इंटरनेटवर व्हायरल

**दैनिक युवक आधार**
**नवी दिल्ली**

एअर इंडियाच्या दिल्ली-दुबई विमान प्रवासातील एका विचित्र आणि विनोदी घटनेने इंटरनेटवर नेटकऱ्यांचे लक्ष वेधले आहे. विमानातील अधिकृत 'कॅबिन डिफेक्ट लॉगबुक'मध्ये एअर इंडियाच्या कर्मचाऱ्याने केलेली नोंद व्हायरल झाली असून "उड्डाणादरम्यान सापडलेले जिवंत झुरळ, फाशी देऊन ठार मारण्यात आले" अशी नोंद वाचून नेटकरी हसून लोटपोट झालेत.

नेमकं काय घडलं?

ही अनोखी नोंद २४ ऑक्टोबर २०२५ रोजीच्या एअर




इंडियाच्या दिल्ली-दुबई विमान प्रवासादरम्यान करण्यात आली. हाताने लिहिलेल्या नोंदीचा फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाला.

आता त्यातील शब्दप्रयोग वाचून नेटकऱ्यांना हसू आवरणे कठीण झाले आहे. साधारणपणे अशा नोंदींचा उद्देश विमानातील तांत्रिक किंवा स्वच्छतेशी संबंधित समस्यांची नोंद करणे आणि त्यांचा अहवाल देणे हा असला तरी, "मरेपर्यंत फाशी" असा नाट्यमय उल्लेख केल्यामुळे नेटकरी मजेशीर कमेंट्सचा वर्षाव करीत आहेत.

नेमकं लॉगबुकमध्ये काय लिहिलं होतं?

२४ ऑक्टोबर रोजीच्या 'एआय ३१५' या विमानाच्या उड्डाणादरम्यान काय समस्या उद्भवली आणि त्यावर काय उपाययोजना केली याबाबत नोंदवहीत लिहिले आहे - "Cockroach found alive by guest - cockroach hanged until death." म्हणजेच "प्रवाशाला जिवंत झुरळ दिसले - झुरळाला फाशी देऊन ठार केले."

नेटिझन्सच्या प्रतिक्रिया

"हे चुकीचं आहे. झुरळ खरंच प्रवासी होता का, हे तपासलं का? त्याची बाजू ऐकण्याची संधी न देता अशी कारवाई कशी केली? एअर इंडियाला लाज वाटली पाहिजे." अशा एकाहून एक मजेशीर प्रतिक्रिया नेटिझन्स व्हायरल झालेल्या फोटोखाली नोंदवत आहेत. दरम्यान, या व्हायरल नोंदीबाबत एअर इंडिया किंवा तिच्या देखभाल विभागाकडून अद्याप कोणतेही अधिकृत निवेदन जारी करण्यात आलेले नाही. तथापि, हशा आणि मीम्सच्या या लाटेत काही वापरकर्त्यांनी स्वच्छता आणि विमानांमधील कीटक नियंत्रणाच्या उपाययोजनांबाबतही (विशेषतः आंतरराष्ट्रीय उड्डाणांच्या बाबतीत) चिंता व्यक्त केली आहे.


## लेनाडी नदीपात्रात चारचाकी कोसळली

**दैनिक युवक आधार**
**ठाणे**

शहापूर ते खोपोली या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ A चे काम गेल्या आठ वर्षांपासून कासव गतीने सुरू असून अद्यापही अपूर्ण आहे. या रखडलेल्या कामामुळे आतापर्यंत अनेकांना जीव गमवावा लागला आहे, तर अनेक जण गंभीर जखमी झाले आहेत. अशाच निष्काळजीपणामुळे शुक्रवारी रात्री भीषण अपघात घडला.

नाशिक येथील अहिरे कुटुंब प्रवासादरम्यान अपघातग्रस्त झाले, मात्र दैव बलवत्तर ठरल्याने दांपत्य सुखरूप बचावले.

नाशिक येथील गुलाबराव अहिरे, त्यांची पत्नी प्रणिता अहिरे, मुलगा अर्थव आणि क्षितिजा अहिरे हे कारने रत्नागिरीकडे प्रवास करत होते. रात्रीच्या वेळी शहापूर तालुक्यातील लेनाडी नदीवरील पुलाजवळ रस्त्याचा अंदाज न आल्याने, तसेच महामार्गावर कोणतेही इशारा फलक नसल्याने त्यांच्या गाडीचा ताबा सुटला आणि कार थेट नदीपात्रात कोसळली.



अपघातानंतर शेंद्रण बुद्रुक गावातील पोलीस पाटील शिवाजी पाटोळे आणि गावातील सतर्क नागरिकांनी प्रसंगावधान राखून नदीपात्रात उतरून दांपत्याला सुरक्षित बाहेर काढले. जखमींना शेंद्रण प्राथमिक आरोग्य केंद्रात नेऊन प्राथमिक उपचार देण्यात आले. या अपघातानंतर ग्रामस्थांनी तीव्र संताप व्यक्त केला असून, आठ वर्षांपासून सुरू असलेले हे महामार्गाचे कासवगतीने सुरू असलेले काम अखेर कधी पूर्ण होणार?

आणखी किती लोकांना आपला जीव गमवावा लागणार? असा यक्षप्रश्न विचारला जात आहे. प्रशासन याकडे गांभीर्याने पाहून ठोस भूमिका घेणार का, हे पाहणे औत्सुक्याचे ठरत आहे.

# बार्टीच्या कौशल्य विकास प्रशिक्षणाचा अनुसूचित जातीच्या युवकांना लाभ

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी राकेश यादव**

**नागपूर :** बार्टी राज्यातील अनुसूचित जातींच्या युवक-युवतींना प्रशिक्षण व कौशल्य विकासाच्या माध्यमातून सक्षम करण्याचा उपक्रम राबवत आहे. महाराष्ट्रातील सर्व 36 जिल्ह्यांमध्ये चालू असलेल्या या कार्यक्रमामुळे अनेक युवकांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत. उद्योग, सेवा, माहिती तंत्रज्ञान, आरोग्यसेवा, शेती व खाद्य प्रक्रिया क्षेत्रात प्रशिक्षण उपक्रम सुरू आहेत.

या उपक्रमाचा उद्देश युवकांना व्यावसायिक, तांत्रिक आणि उद्योजकतेच्या कौशल्यांनी सक्षम करणे हा आहे. त्यामुळे ते रोजगाराच्या संधी मिळवू शकतील किंवा स्वतःचा व्यवसाय उभा करू शकतील. या प्रशिक्षणांतर्गत युवकांना उद्योग, सेवा, माहिती तंत्रज्ञान, आरोग्यसेवा, हातमाग, शेती, खाद्य प्रक्रिया यांसारख्या विविध क्षेत्रांत प्रशिक्षण दिले जात आहे.

बार्टीच्या कौशल्य विकास प्रशिक्षणाला राज्यातील अनेक नामांकित प्रशिक्षण भागीदारांचा पाठिंबा मिळत आहे. त्यामध्ये सह्याद्री रुरल डेव्हलपमेंट फाउंडेशन, प्रथम एज्युकेशन फाउंडेशन, ब्राईट फ्युचर इंडिया, स्किल टेक साई सर्व्हिस फाउंडेशन, सिम्बायोसिस स्किल्स अँड प्रोफेशनल युनिव्हर्सिटी, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (MCED), इंडो-जर्मन टुल रूम (IGTR), टेक महिंद्रा स्मार्ट अकॅडमी फॉर हेल्थकेअर, खादीग्राम उद्योग महामंडळ, टाटा स्ट्राईव्ह आदी संस्थांचा समावेश आहे. बार्टीच्या प्रशिक्षण योजनांची माहिती आणि प्रवेशप्रक्रिया बार्टीच्या https://www.barti.in/या अधिकृत वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शिक्षण व कौशल्यविकासाच्या विचारांना मूर्त रूप देण्याचा आमचा प्रयत्न आहे. प्रत्येक युवकाला त्याच्या क्षमतेनुसार योग्य प्रशिक्षण मिळावे, हा आमचा उद्देश आहे. या उपक्रमात सामाजिक न्याय विभागाचे मार्गदर्शन, तसेच प्रशिक्षण भागीदार व प्रशिक्षकांचे सहकार्य लाभत आहे. या संयुक्त प्रयत्नातून राज्यातील अनुसूचित जातींचे युवक अधिक सक्षम, स्वावलंबी आणि सशक्त समाजनिर्मितीकडे वाटचाल करीत असल्याची माहिती बार्टीचे महासंचालक सुनील वारे यांच्याकडून देण्यात आली आहे.

# राज्यातील सर्वात मोठया दिवाळी अंक स्पर्धेचे रौप्यमहोत्सव

## राज्यस्तरीय प्रथम क्रमांकाला ०१ लाख रुपये तर रायगड जिल्हास्तरीय प्रथम क्रमांकास ४० हजार रुपये

**राज्यातील सर्वात मोठी आणि प्रतिष्ठित म्हणून ओळखली जाणारी हि दिवाळी अंक स्पर्धा यंदा रौप्यमहोत्सवी वर्षात प्रवेश करत आहे. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली गेली २५ वर्षे ही स्पर्धा सातत्याने आयोजित होत असून, राज्यभरातील विविध दिवाळी अंकांना प्रोत्साहन देत आहे. राज्यातील दिवाळी अंकांच्या समृद्ध परंपरेला आणि सर्जनशीलतेला बळ देण्याच्या हेतूने सुरू झालेली ही स्पर्धा आज संपादक, लेखक, कलाकार आणि वाचक यांच्यातील सृजनशीलतेचा दुवा आणि संवादाचे व्यासपीठ म्हणून ओळखली जाते.**

**दैनिक युवक आधार**
**पनवेल(प्रतिनिधी) :** माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली शैक्षणिक, सामाजिक, कला. क्रीडा, सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करणाऱ्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ व मुंबई मराठी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने २५ व्या अर्थात रौप्यमहोत्सव राज्यस्तरीय आणि रायगड जिल्हास्तरीय दिवाळी अंक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

दिवाळी अंक ही महाराष्ट्राची पूर्वापार चालत आलेली एक सांस्कृतिक परंपरा आहे. ही परंपरा अखंडपणे चालू राहावी व त्यातून दर्जेदार दिवाळी अंकांची निमिर्ती



व्हावी, यासाठी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्यावतीने गेल्या २४ वर्षापासून महाराष्ट्रातील सर्वात मोठया दिवाळी अंक स्पर्धेचे आयोजन करण्यात येत असून यंदा ही २५ वी स्पर्धा आहे.

भरघोस रक्कमेची पारितोषिक असलेल्या या स्पर्धेच्या राज्यस्तरीय दिवाळी अंक स्पर्धेमधील विजेत्या प्रथम क्रमाकांस ०१ लाख रुपये, व्दितीय क्रमाकांस ५० हजार तर तृतीय क्रमाकांस ३० हजार रूपये तसेच आकर्षक सन्मानचिन्ह देवून सन्मानित करण्यात येणार आहे. त्याचबरोबर या स्पर्धेतील लक्षवेधी उत्कृष्ट अंकाला १५ हजार रुपये, सर्वोत्कृष्ट विशेषांकाला १५ हजार रुपये, उत्कृष्ट कथेसाठी ०७ हजार रूपये, उत्कृष्ट कविता, उत्कृष्ट व्यंगचित्र, उत्कृष्ठ लेख, लक्षवेधी परिसंवाद, लक्षवेधी मुलाखत व उत्कृष्ठ मुखपृष्ठ यांना प्रत्येकी ०५ हजार रुपये, त्याचबरोबर बालसाहित्याच्या सवोत्कृष्ट अंकास ७५०० रूपये, सर्वोत्कृष्ट डिजिटल अंकाला ७५०० रुपये तसेच रायगड जिल्हयातून प्रकाशित होणाऱ्या दिवाळी अंकांसाठी खास पारितोषिके देण्यात येणार असून यामध्ये प्रथम क्रमांकास ४० हजार रूपये, व्दितीय क्रमांकास २० हजार रूपये आणि तृतीय क्रमाकांस १० हजार रूपये, दोन उत्तेजनार्थ प्रत्येकी ०५ हजार रुपये, उत्कृष्ठ कथा, कविता आणि व्यंगचित्र यांना प्रयेकी ०५ हजार रुपये आणि सर्व पुरस्कारप्राप्त अंकांना सन्मानचिन्ह असे बक्षिसांचे स्वरूप आहे.

दरवर्षीप्रमाणे यंदाही या स्पर्धेत स्पर्धकांनी मोठया संख्येने सहभाग घ्यावा असे आवाहन श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण, संयोजक दीपक म्हात्रे यांनी केले आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी दिवाळी अंकाच्या दोन प्रती १०० रूपये प्रवेश फीसह १५ डिसेंबर २०२५ पर्यत पाठवाव्यात. दिवाळी अंक पाठविण्यासाठी व अधिक माहितीसाठी श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, प्लॉट क्रमांक ४७५, मार्केट यार्ड, पनवेल, जि. रायगड. अनिल कोळी (९७६९४०९१६१) यांच्याशी संपर्क साधावा, असेही आवाहन आयोजकांनी केले आहे.

# तब्बल पंचवीस वर्षानंतर भेटले शालेय विद्यार्थी

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी सोयगाव विजय काळे**

**सोयगाव:-** तालुक्यातील फर्दापूर माणिकराव पालोदकर विद्यालय फर्दापूर ता. सोयगाव येथे सन २०००-०१ या शैक्षणिक वर्षातील विद्यार्थ्यांचा स्नेहमिलन सोहळा उत्साहात संपन्न झाला. आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात सर्वच बॅचमेट्सचा एकमेकांशी संपर्क असतोच तरीही शाळेच्या मैदानात भेटण्याचा आनंद काही औरच असतो. या स्नेहमिलनाचे आयोजना प्रसंगी माजी मुख्याध्यापक पी.के.शिंदे,मा.शिक्षक एन. टि.जाधव,आजी मुख्याध्यापक के.आ. पाटील,काकडे सर,सोत्रे सर,तसेच सोनावणे मामा,महाकाळ मामा,यांचे माजी विध्यार्थ्याकडून शाल-श्रीफळ देऊन स्वागत करण्यात आले.यावेळी माजी विद्यार्थ्यांची उपस्थिती लक्षणीय होती.



या प्रसंगी शिक्षकांनी एकदिवसाची शाळा वर्गात भवरून विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांच्या आठवणींना उजाळा दिला.या सोहळयाच्या अध्यक्षस्थानी पी.के.शिंदे हे होते. स्नेहमिलनाचे अध्यक्ष यांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमाना पुष्प वाहून व दिपप्रज्वलीत करून उद्घाटन करण्यात आले.या प्रसंगी सर्व शिक्षकांचा व शिक्षकेतर कर्मचारी यांचा सत्कार करण्यात आला. सर्व विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी आपल्या जुन्या आठवणींना उजाळा देत मनोगत व्यक्त केले. त्यांची मने जुन्या आठवणीमुळे भावुक झाली.

यावेळी विनोद इंगळे, योगेश गायकवाड, संदीप जयस्वाल ,चंद्रकांत दामोदर, सलीम शहा ,जितेंद्र बनसोडे ,सचिन सुरडकर, सागर साळवे ,हकीम पठाण, ईश्वर हातोडे, अजीम सय्यद ,सागर बिरारे, जाकेर बशीर, आसिफ पठाण, विलास आगळे, संजय महाकाळ, जाकिर तडवी, सचिन बोर्डे ,जाकीर शेख, विलास कल्याणकर ,अनिल भुजबळ ,अनिश गहिरे ,गणेश खाकरे, कपिल घोरपडे, अनिल जोहरे, प्रवीण दामोदर, संजय शिंदे, अनिल सोनवणे, मुकेश आरक, रामेश्वर काळे, प्रमोद बिरारे ,संदीप जाधव, सुभाष राजपूत, जमील सय्यद, ज्योती काटे, जया तायडे ,मनिषा सुरडकर, ज्योती पवार ,सुषमा सुरडकर, माया काकडे, मंदाकिनी शिंदे ,सुरेखा, ज्योती, योगिता महाकाळ ,गीता अंभोरे, अलका होंडाळे ,ज्योती बोराडे ,यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमासाठी उपस्थित झालेल्या सर्व माजी विद्यार्थ्यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. सर्व शिक्षकांसह गप्पागोष्टी, जुन्या आठवणींची उजळणी करण्यात आली. सर्वांनी त्या काळातील शाळेतील आठवणींना उजाळा देत परस्परांशी संवाद साधला.सर्व उपस्थित भगिनींना दिवाळी भेट -साडी देण्यात आली.

सर्वांनी आपली ओळख करुन देत शालेय जीवनातील स्मरणीय आठवणीव्यक्त केल्या त्यामुळे मनमुरात हास्य जे प्रापंचीक जीवनात हरवले ते अनुभवता आले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सागर बिरारे, प्रास्ताविक अरुण गायकवाड यांनी केले तर आभार सरपंच सय्यद अजीम सरपंच यांनी मानले.

# पापळ येथे बिबट्याच्या हल्ल्यात गाईचे वासरू ठार

**दैनिक युवक आधार**
**जाफराबाद टेंभूर्णी प्रतिनिधी -अनिल ससाने**

पापळ तालुका जाफराबाद जिल्हा जालना येथील शेतकरी पुंजाराम बापूराव खडसे यांच्या शेतात गट नंबर 58 मध्ये काल सकाळी चार ते पाच वाजण्याच्या सुमारास बिबट्याने शेतातील जनावराच्या कोठ्यावर हल्ला केला असता गाय ही बैलगाडीला बांधलेली होती गाईने बिबट्याला बघून गाडी ओढून दूरवर घेऊन गेली असता बिबट्याने गाईचे वासरावर हल्ला केला त्या हल्ल्यात वासरू ठार झाले सकाळी सहा वाजता भगवान खडसे हे जनावराचे शेण काढण्यासाठी कोठ्यावर गेले असता त्यांनी ते बघितले व त्यांनी गावात फोन केला गावातील नागरिक घटनास्थळी दाखल झाले व जाफराबाद वनरक्षक यांना फोन लावला वनरक्षक हाटकर साहेब व पशु वैद्यकीय अधिकारी युवराज सूर्यवंशी हे घटनास्थळी दाखल झाले संबंधित घटनाचा पंचनामा केला व वनरक्षक यांनी बिबट्याच्या बोटाच्या ठसे पाहून ते म्हणाले की हा दुसरा कोणता प्राणी नसून हा बिबट्या आहे वनरक्षक हाटकर म्हणाले की पुंजाराम खडसे यांना त्यांच्या झालेल्या नुकसानीची भरपाई मिळेल व गावातील नागरिकांनी सतर्क राहावे असा इशारा दिला रात्रीला कोणी बाहेर पडू नये



अर्जंट काम असेल तर सोबत कोणाला घ्यावं व मोबाईलचा आवाज किंवा टॉर्च लावावे हातात काठी घ्यावी व ते म्हणाले बिबट्या हा माणसावर सहजासहजी हल्ला करीत नाही तो आपल्यापेक्षा कमी हाईटची शिकार पाहतो माणूस वाकून काम करीत असेल किंवा खाली बसेल असेल तेव्हा तो हल्ला करतो असे हाटकर म्हणाले तरी पंचक्रोशीतील नागरिकांनी सतर्क रहावे असे काटकर म्हणाले वेळ पडल्यास आम्ही पिंजरा लावून बिबट्याला पकडू पापळ व पंचक्रोशीतील लोकामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे घटनास्थळी पंचनामा करण्यासाठी गणेश खडसे ,ज्ञानेश्वर मोरे, परमेश्वर मोरे ,अनिल ससाने, शामराव जाधव,अनिल जाधव, संतोष मोरे, डॉ. राज राठोड, प्रल्हाद मोरे, मुरलीधर जाधव ,वाल्मीक मस्के ,गणेश गायकवाड ,मुस्ताक शेख ,रामा कुहीरे ,कुंडलिक मोरे ,संतोष गायकवाड ,व इत्यादी गावकरी उपस्थित होते

**मनोगत**
**परमेश्वर मोरे शेतकरी (पापळ)**
**मागील आठ दहा दिवसापासून आमच्या कानावर अशी बातमी ऐकायला आली होती आजूबाजूच्या परिसरामध्ये बिबट्या आढळून आला आहे आज आमच्या गावामध्ये बिबट्याने पुंजाराम खडसे यांच्या जनावराच्या गोठ्यावर हल्ला करून वासराला ठार केले आहे तरी मी गावकऱ्यांच्या वतीने वनआधिकारी यांना विनंती करतो की त्यांनी लवकरात लवकर या बिबट्याचा बंदोबस्त करावा कारण आमच्या शेतामध्ये कापूस वेचणे चालू होणार आहे आणि बिबट्याच्या असण्यामुळे आमचा कापूस शेतात पडून राहील व शेतकऱ्याची लाखो करोडो रुपयाची नुकसान होऊ नये या अनुषंगाने वनआधिकाऱ्याने बिबट्याचा बंदोबस्त करावा ही विनंती**

# राष्ट्रीय महामार्गावर स्पीड गव्हर्नरची अंमलबजावणी करा मनसे

## मनसे तालुकाप्रमुख नामदेव गावित यांचे आरटीओ अधिकाऱ्यांना निवेदन



**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी- कृष्णा गायकवाड**

भरधाव वेगाचा कहर थांबवा! — महामार्गांवरील वाढत्या अपघातांबाबत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची तातडीची मागणी नाशिक जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्गांवर वाहनांच्या भरधाव वेगामुळे सातत्याने अपघातांच्या घटना वाढत आहेत. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने आज आरटीओ अधिकारी मा. राजश्री गुंड मॅडम यांना निवेदन देण्यात आले.तसेच पोलिस अधीक्षक कार्यालय आडगाव (नाशिक ग्रामीण) यांना हि निवेदन देण्यात आले आहे.

नाशिक जिल्ह्यातून गुजरात राज्याला जोडणारे दोन प्रमुख राष्ट्रीय महामार्ग —

नाशिक – पेठ – धरमपूर मार्ग, दिंडोरी – वणी – सापुतारा मार्ग या दोन्ही महामार्गांवर अती भरधाव वेगाने वाहन चालवल्याने अपघातांचे प्रमाण झपाट्याने वाढले आहे. अनेक निरपराध नागरिकांना आपले प्राण गमवावे लागत आहेत, तर काहींना गंभीर दुखापती होत आहेत. विशेषतः भाजीपाला वाहतूक करणाऱ्या पिकअप गाड्या आणि मोठ्या वाहनांचा बेफाम वेग ही गंभीर समस्या बनली आहे.

राष्ट्रीय महामार्ग क्र. 848 हा विशेषतः अतिअपघातप्रवण ठरत असून, या मार्गावरील अपघातांच्या घटना सतत माध्यमांमध्ये झळकत आहेत. या गंभीर परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यासाठी मनसेतर्फे प्रशासनाकडे खालील तातडीच्या मागण्या करण्यात आल्या —

१)महामार्गावरील सर्व वाहनांमध्ये स्पीड गव्हर्नरची काटेकोर अंमलबजावणी करावी.

२) अपघातप्रवण ठिकाणी CCTV कॅमेरे बसवावेत.

३)स्पीड मॉनिटरिंग व ई-चलन प्रणाली कार्यान्वित करावी.

वरील मागण्यांवर तात्काळ कार्यवाही न झाल्यास महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा यावेळी देण्यात आला आहे.

याप्रसंगी महाराष्ट्र नवनिर्माण सेना दिंडोरी तालुका अध्यक्ष नामदेव गावित, नंदू मोरे, तालुका उपाध्यक्ष सतीश मालसाणे उपस्थित होते.

# श्री गजानन महाराजांची नागपूर-कोराडी पायदळ दिंडी यात्रा रविवारी संपन्न



**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी सतीश कडू**

दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुद्धा श्री संत गजानन महाराज यांची पायी दिंडी यात्रा रविवार दि. २६ ऑक्टोबर रोजी श्री संत गजानन महाराज मंदीर, निर्मल नगरी, उमरेड रोड, नागपूर येथून सकाळी ६ वाजता निघून श्री महालक्ष्मी जगदंबा माता मंदिर कोराडी येथे १ वाजेपर्यंत पोहचली. दिंडी यात्रेत सहभागी होणारे १००० माऊली भक्तगण आई, वडील, बंधु, भगिनी, छोटे बाल गोपाल, माय माऊली, मंदिरातील सर्व सेवेकरी माऊली या सर्वांच्या सहकार्याने व अथक परिश्रमाने हा दिंडी सोहळा मोठया संख्येने सहभागी होऊन थाटात पार पडला. हा नयनरम्य पालखी सोहळा पाहण्याचा आनंद भक्तांच्या चेहऱ्यावर दिसत होता. कोराडी श्री महालक्ष्मी जगदंबा मातेच्या मंदिरात निर्मल नगरी मंदिर ट्रस्टकडून महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. दुपारी २ वाजता महाप्रसाद सुरू झाला आणि सायंकाळी ६ वाजेपर्यंत दिंडीत सहभागी होणाऱ्या १००० भक्त व दिंडी सोहळा पाहण्यासाठी परस्पर येणारे भक्तगण असे एकूण ३००० माय-माऊली भक्तांनी ज्योती हॉल येथे महाप्रसादाचा लाभ घेतला. दिंडी यात्रेत सहभागी होणाऱ्या सर्व श्री भक्तांचे मंदिर ट्रस्टकडून खूप खूप आभार श्री संत गजानन महाराज सेवा ट्रस्ट निर्मल नगरी, उमरेड रोड, नागपूर चे सचिव सुनिल बालपांडे यांनी मानले.

# सिडकोच्या स्वप्नपूर्तीत पायाभूत सुविधांचा आद्यपही अभाव

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर):**

पनवेल परिसरातील शहराची उभारणी करण्यात महत्वाची संस्था मानल्या जाणाऱ्या सिडकोच्या वतीने पनवेल, खारघर, उलवे, तळोजा अशा विविध ठिकाणी १ लाख सदनिकांची उभारणी केली आहे. मात्र, या स्वप्नपूर्तीच्या घरातील पायाभूत सुविधांचा अभाव दिसू लागला आहे.

ऐन दिवाळीत पनवेल परिसरातील नागरिकांना पाण्यापासून वंचित राहावे लागल्याने नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे. सिडकोच्या वतीने पनवेल परिसरात खारघर, कळंबोली, कामोठे, तळोजा, उलवे या परिसरात एक लाख घरांची उभारणी केली आहे. याच सिडकोने नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारणीत महत्वाची भूमिका बजावली आहे. येत्या काळात आणखी एक लाख घरांची उभारणी करण्याचा सिडकोचा मानस आहे. त्यामध्ये खारघर येथे ५० हजार घरे, तळोजामध्ये २५ हजार, कळंबोली मध्ये १० हजार तर उलवे येथे १५ हजार सदनिका यांचा समावेश आहे. असे असले तरी आता बांधण्यात आलेल्या घरांमध्ये मात्र पायाभूत सुविधांचा अभाव दिसू लागला आहे. ऐन दसरा दिवाळीच्या दिवसात या घरातील नागरिकांना पाणी पुरवठा होत नसल्याचे नागरिकांकडून सांगण्यात आले. नागरिक संतप्तऐन दिवाळीत पाण्यासाठी तरसत होतो. दुसऱ्यांच्या घरी जाऊन पाणी मागितले आहे. एवढा पाऊस पडला ते पाणी सिडकोने काय केले ? सिडको हे पाणी इतर बांधकामसाठी विकत असणार आहे. सिडको चोर आहे आणि ते पाणी विकत आहेत अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकांनी दिली. तर ही स्वप्नपूर्तीची घरं म्हणून देण्यात आली होती. स्वप्न पाहून सर्वांनी कर्ज काढून घरे घेतली.

करारामध्ये २४ तास पाणीपुरवठा असणार असे नमूद करण्यात आले होते. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी देखील पाणी नव्हते. सिडकोला जर स्वप्न पूर्ती करायची असेल तर पाणीपुरवठा करावा असे देखील नागरिकांनी सांगितले. महाविकास आघाडी, मनसे आक्रमकपनवेल परिसरात सिडकोच्या नियोजनशून्य



कारभारामुळे लाखो रहिवासी पाण्यापासून वंचित आहेत. ऐन सणासुदीच्या काळात त्यांचे पाण्यावाचून हाल झाले. ‘जो पर्यंत येथील नागरिकांना पाणीपुरवठा सुरळीत होत नाही, तोपर्यंत नवीन बांधकामांसाठी नवीन सीसी, नवीन ओसी द्यायचं बंद करा’, अशी मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली आहे. खारघर, तळोजा, कामोठे आणि उलवे यांसारख्या परिसरात ही परिस्थिती गंभीर असून, कोट्यवधींचे प्रकल्प उभारणाऱ्या सिडकोला नागरिकांना मूलभूत सुविधा देण्यात अपयश आल्याचा आरोप केला जात आहे. एकीकडे पंतप्रधान आवास योजनेतील घरांना पाणी नाही, तर दुसरीकडे खाजगी बिल्डरांना पाणीपुरवठा होत असल्याचा आरोप महाविकास आघाडीने केला आहे.

या समस्येमुळे मनसेनेही सिडकोला पायाभूत सुविधांवर आधी लक्ष केंद्रित करण्याचा सल्ला दिला आहे.

**दैनिक युवक आधार** हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# स्ट्रोक नंतर पुर्वपदावर येताना अशी घ्या काळजी डॉ. सुनील कुट्टी, नवी मुंबई येथील न्यूईरा हॉस्पिटलमधील प्रसिध्द न्यूरोसर्जन (मेंदू आणि मणका)

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी** : काही रुग्णांसाठी स्ट्रोक नंतर बरे होणे खूप आव्हानात्मक ठरु शकते. मात्र तरीदेखील , खचून जाऊ नका, कारण त्वरित उपचार आणि काळजी घेतल्यास रुग्ण पुन्हा पुर्ववत आयुष्य जगु शकतो. म्हणून, स्ट्रोक नंतर जीवनाची गुणवत्ता सुधारण्यासाठी या महत्त्वपूर्ण टिप्सचे पालन करा.

मेंदूच्या एखाद्या भागात रक्त प्रवाह अवरोधित झाल्यावर किंवा रक्तवाहिनी फुटल्यास, ऑक्सिजन आणि पोषक तत्वांना मेंदूच्या पेशींपर्यंत पोहोचण्यापासून रोखल्यावर स्ट्रोक येतो. त्याची कारणं ही उच्च रक्तदाब, मधुमेह, उच्च कोलेस्ट्रॉल, धूम्रपान आणि हृदयरोग आहेत. ही लक्षणं बऱ्याचदा अचानकपणे दिसून येतात आणि शरीराची एक बाजू लूळी पडणे किंवा सुन्नपणा येणे, अस्पष्ट बोलणे , चेहरा एका बाजूस वळणे, दृष्टीदोष, चक्कर येणे किंवा संतुलन बिघडणे यांचा समावेश आहे. उपचार हे स्ट्रोकच्या प्रकारावर अवलंबून असतात. क्लॉटमुळे होणाऱ्या इस्केमिक स्ट्रोकमध्ये, डॉक्टर रक्त प्रवाह पुनर्संचयित करण्यासाठी क्लॉट-बस्टिंग औषधं किंवा थ्रोम्बेक्टॉमी सारख्या प्रक्रियेचा वापर केली जातो. रक्तस्त्राव झाल्यास तो थांबविण्यासाठी आणि मेंदूवरील दाब कमी करण्यासाठी शस्त्रक्रियेची आवश्यकता भासू शकते. तात्काळ उपचारांमुळे मृत्यू, अर्धांगवायू यासारख्या गुंतागुंतीचा धोका कमी होतो आणि बरे होण्याची शक्यता वाढते.

रुग्णाला निरोगी जीवन जगता यावे यासाठी स्ट्रोकनंतर विशेष काळजी घेणे गरजेचे आहे. डॉक्टरांनी दिलेल्या सूचनांचे पालन करणे आवश्यक आहे. स्ट्रोकनंतर बरे होण्यासाठी वेळ आणि इच्छाशक्ती लागते. स्ट्रोकनंतरचे पुनर्वसन हे रुग्णांना उर्जा, शारीरीक हालचाल पुर्ववत करण्यासाठी आणि आत्मविश्वास परत मिळविण्यास मदत करते.

**स्ट्रोकनंतर पुर्वपदावर येताना काय कराल?**

फिजिओथेरपी : शारीरीक उर्जा, संतुलन आणि समन्वय पुनर्संचयित करण्यास मदत करते. घरी तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली व्यायाम करा. व्यायामाचा अतिरेक टाळा.

स्पीच अँड लँग्वेज थेरपी : स्पीच अँड लँग्वेज थेरपिस्टसोबत बोलणे आणि अन्न गिळण्यासंबंधी अडचणी दूर करण्यास मदत करतील. तुम्हाला किमान २ ते ३ महिने स्पीच अँड लँग्वेज थेरपीची आवश्यकता भासू शकते.

ऑक्युपेशनल थेरपी : स्ट्रोकच्या रुग्णांना कपडे घालणे, खाणे आणि लिहिणे यासारख्या दैनंदिन क्रियाकलाप पुर्ववत सुरु करण्यास मदत करते.

डाएट : आहारातील मीठाचे प्रमाण मार्यदित करणे आणि चरबीयुक्त पदार्थांचे सेवन कमी करणे हे रक्तदाब आणि वजन व्यवस्थापनात मदत करते.

भावनिक आणि मानसिक आधार: समुपदेशन हे मानसिकदृष्ट्या सक्षम करण्यास मदत करते. स्ट्रोकचे रुग्ण त्यांच्यासारख्या इतर रुग्णांशी संवाद साधु शकतात आणि त्यांच्या प्रवासाबद्दल जाणून घेऊ शकतात.

नियमित वैद्यकीय तपासणी: पुनरावृत्ती टाळण्यासाठी वेळोवेळी रक्तदाब, रक्त शर्करा आणि कोलेस्ट्रॉल तपासा. या समस्या व्यवस्थापित करण्यासाठी औषधं चुकवू नका.

कौटुंबिक आधार : आपल्या सर्वांनाच माहित आहे की कोणत्याही आजारपणात कुटुंबाचा आधार किती महत्त्वाचा असतो आणि रुग्ण बरा होण्याच्या टप्प्यावर तो तितकीच महत्त्वाचा ठरतो. स्ट्रोकनंतर बरे होण्यासाठी संयम आवश्यक आहे. कुटुंबियांचा मानसिक आधार हा स्ट्रोक येऊन गेलेल्या तुमच्या प्रिय व्यक्तीला जलद बरे होण्यास मदत करतो.

योग्य पुनर्वसन, आहार आणि डॉक्टरांचा सल्ला मिळाल्यास स्ट्रोक मधुन वाचलेले बरेच रुग्ण सामान्य जीवनात जगू शकतात आणि भविष्यातील स्ट्रोकचा धोका टाळू शकतात.

# मुदखेडमध्ये शेतकऱ्यांचा संताप तहसीलदारांच्या गाडीची तोडफोड;

## "जय जवान, जय किसान" घोषणांनी परिसर दणाणला

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी – प्रकाश गवारे**

देवेंद्र फडणवीस सरकारच्या जुलमी कारभाराविरोधात आणि शेतकऱ्यांवरील अन्यायाच्या निषेधार्थ मुदखेड येथे शेतकऱ्यांनी सोमवारी तीव्र आंदोलन छेडले. तहसील कार्यालयासमोर "जय जवान, जय किसान" अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. संतप्त शेतकऱ्यांनी तहसीलदारांच्या गाडीची तोडफोड करत प्रशासनाविरोधात तीव्र संताप व्यक्त केला.शेतकरी साईनाथ पाटील खानसोळे (वासरी) यांनी शेतकऱ्यांचा आक्रोश व्यक्त केल्याने त्यांना अन्यायाने तुरुंगात डांबण्यात आल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. या घटनेचा निषेध म्हणून आंदोलन अधिक आक्रमक झाले. शेतकरी यांनी हे सरकार सांगते आम्ही सरकारी खाद्य लावु व हे सरकार व्यापार्यांच सरकार आहे "फाशी झाली तरी चालेल, पण शेतकऱ्यांवर अन्याय होऊ देणार नाही" अशी घोषणा देत सरकारला खुले आव्हान दिले.

दुष्काळामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न कोसळले असून पिके नष्ट झाल्याने अनेकांच्या घरातील दिवाळी अंधारात गेली आहे. शासनाने जाहीर केलेल्या दुष्काळी आणुदानापासून शेतकरी वंचित राहिल्याने संतापाचा उद्रेक झाला आहे. शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे तात्काळ आर्थिक मदत, पिकविमा रक्कम वाटप आणि त्वरित उपाययोजना राबविण्याची मागणी केली आहे.घटनेनंतर पोलिसांनी शेतकऱ्यांना ताब्यात घेतले असून तहसील परिसरात पोलिसांचा बंदोबस्त वाढवण्यात आला आहे.या अन्यायाच्या विरोधात दि. 28 ऑक्टोबर 2025 रोजी सकाळी 10:00 वाजता तहसील कार्यालय, मुदखेड येथे ठिया आंदोलन आयोजित करण्यात आले आहे. शेतकरी संघटनांनी सर्व शेतकरी बांधवांना एकजुटीने उपस्थित राहून आपल्या हक्कासाठी आवाज उठविण्याचे आवाहन केले आहे.

# पनवेलमध्ये सिलिंडरला लागलेली आग वेळीच विझवली; मोठा अनर्थ टळला

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर):**

पनवेल शहरातील लक्ष्मी वसाहत झोपडपट्टी परिसरात सकाळी सिलिंडरला लागलेल्या आगीमुळे मोठी खळबळ उडाली. सुदैवाने, अग्निशमन दलाने योग्य वेळी घटनास्थळी धाव घेतली आणि आगीवर नियंत्रण मिळवले. त्यामुळे संभाव्य मोठा अनर्थ टळला.

ही माहिती मिळताच माजी नगरसेविका दर्शन भोंईर यांनी महापालिकेच्या अग्निशमन दलाला तत्काळ कळविले. त्यानंतर अग्निशमन दलाचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी शर्थीचे प्रयत्न करून आग विजवली. या आगीत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी परिसरातील नागरिकांमध्ये काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. गॅस सिलिंडरमधून झालेल्या गळतीमुळे ही आग लागली असावी असा अंदाज व्यक्त केला जात आहे. अग्निशमन दलाच्या तत्परतेमुळे आग शेजारील घरांपर्यंत पसरली नाही. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनीही तातडीने मदतीला धाव घेतली. या वेळी राजू कोळी, हसन बागवान, रोशन जाधव, चंद्रकांत जगे आणि इतर नागरिक घटनास्थळी उपस्थित होते.

पनवेल महापालिकेच्या अग्निशमन विभागाकडून या प्रकरणाचा तपास सुरू असून भविष्यात अशा प्रकारच्या घटना टाळण्यासाठी परिसरात सुरक्षेचे उपाय वाढवले जाणार आहेत. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नसल्यामुळे नागरिकांनी सुटकेचा श्वास घेतला आहे.






**आजकाल घरामध्ये एअर प्युरिफायर लावणे अनेकांना गरजेचे वाटते, पण त्याची किंमत हजारोंमध्ये असते. जर तुम्हाला कमी खर्चात तुमच्या घरातील हवा शुद्ध करायची असेल आणि प्रदूषणापासून मुक्ती मिळवायची असेल, तर तुम्ही ₹१००च्या आत सहज उपलब्ध होणारी काही इनडोअर प्लांट्स घरी आणू शकता.ही झाडे फक्त दिसायला सुंदर नसतात, तर ती घरातील हवा शुद्ध करून पहाडांसारखी ताजी हवा तुम्हाला देतात. विशेष म्हणजे, ही झाडे फॉर्मल्डिहाइड, बेंझीन आणि कार्बन मोनॉक्साईडसारखे विषारी वायू शोषून घेतात.**

## स्नेक प्लांट



**फायदा:** हे असे प्लांट आहे जे रात्रीच्या वेळीही ऑक्सिजन सोडते आणि कार्बन डायऑक्साइड शोषून घेते.

**प्रदूषण नियंत्रण:** फॉर्मल्डिहाइड, ट्रायक्लोरोइथिलीन आणि बेंझीनसारखे विषारी कण शोषून घेते.

**विशेषता:** याला खूप कमी पाणी लागते आणि हे कमी प्रकाशातही वाढते, त्यामुळे बेडरूमसाठी उत्तम आहे.

## मनी प्लांट




**फायदा:** मनी प्लांट जवळजवळ प्रत्येक घरात आढळतो. हे दिसायला आकर्षक तर आहेच, पण ते हवा शुद्ध करण्याचे कामही करते

**प्रदूषण नियंत्रण:** कार्बन मोनॉक्साईडसारखे विषारी वायू प्रभावीपणे शोषून घेते.

**विशेषता:** हे रोप कुंडीत किंवा पाण्याने भरलेल्या बाटलीतही सहज वाढवता येते आणि याला जास्त देखभालीची गरज नसते.

## कोरफड



**फायदा:** कोरफडीचे औषधी गुणधर्म सर्वांनाच माहीत आहेत, पण ते एक उत्तम हवा शुद्ध करणारे प्लांट देखील आहे.

**प्रदूषण नियंत्रण:** घरातील हवेतून बेंझीन आणि फॉर्मल्डिहाइड सारखी हानिकारक रसायने शोषून घेते.

**विशेषता:** हे रोप वाढवणे खूप सोपे आहे आणि त्वचेच्या समस्यांसाठीही याचा जेल उपयुक्त असतो.

## स्पायडर प्लांट



**फायदा:** याला एअर प्लांट म्हणूनही ओळखले जाते. हे खूप लवकर वाढते आणि घराला एक सुंदर लुक देते.

**प्रदूषण नियंत्रण:** कार्बन मोनॉक्साईड, फॉर्मल्डिहाइड आणि बेंझीनसारखे सामान्य प्रदूषण घटक शोषून घेते.

**विशेषता:** हे रोप सहजपणे कटिंग्जमधून वाढवता येते. हे घरातील वातावरणातील ओलावा टिकवून ठेवण्यासही मदत करते.

# सरदार वल्लभभाई पटेल यांची १५० वी जयंती

# 'राष्ट्रीय एकता दिवस' विशेष स्वरूपात साजरा होणार !

भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी ३१ ऑक्टोबर राष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजरा केला जातो. या वर्षी त्यांच्या १५० व्या जयंतीच्या निमित्ताने हा दिवस भव्य स्वरूपात साजरा केला जाणार आहे. हा दिवस भारताच्या एकता, अखंडता आणि राष्ट्रीय एकजुटतेचे प्रतीक असून, ५६२ संस्थान एकत्रित येऊन आधुनिक भारताची पायाभरणी करणाऱ्या सरदार पटेलांच्या अद्वितीय कार्याला अभिवादन करणार आहे.

**एकतानगर येथे भव्य परेड आणि सांस्कृतिक कार्यक्रम**

या वर्षीचा उत्सव नैसर्गिक सौंदर्य आणि सांस्कृतिक समृद्धीचा संगम असणाऱ्या गुजरातमधील नर्मदा जिल्ह्यातील एकतानगर येथे आयोजित केला जाणार आहे. हे ठिकाण "विविधतेत एकता" या भारताच्या संकल्पनेचे प्रतीक म्हणून निवडले गेले आहे. या सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे केंद्रीय सशस्त्र पोलीस दल राज्य पोलीस दल आणि राष्ट्रीय कॅडेट कोर यांच्या सहभागाने भव्य परेड आणि सांस्कृतिक उत्सव आयोजित करण्यात आला आहे.

**राष्ट्रीय कॅडेट्स कोर आणि शालेय बँड यांचे सादरीकरण**

या परेडमध्ये सीमा सुरक्षा बल, केंद्रीय राखीव पोलीस दल, केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल, भारत-तिबेट सीमा पोलीस, सशस्त्र सीमा बल तसेच आसाम, त्रिपुरा, ओडिशा, छत्तीसगड, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, पंजाब, जम्मू आणि काश्मीर, केरळ आणि आंध्र प्रदेश या राज्यांच्या पोलीस दलांचा सहभाग असेल. घोडदळ आणि उंटदळाचे संच, स्वदेशी जातींच्या श्वानांचे कौशल्य प्रदर्शन, मार्शल आर्ट सादरीकरणे आणि शस्त्रविरहित युद्धकौशल्याची प्रात्यक्षिके या परेडची शोभा वाढवतील.

महिला सक्षमीकरणावर विशेष भर देत, प्रधानमंत्री यांना दिल्या जाणाऱ्या गार्ड ऑफ ऑनरचे नेतृत्व एक महिला अधिकारी करतील. केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल आणि केंद्रीय राखीव बल च्या महिला कर्मचाऱ्यांकडून मार्शल आर्ट आणि युद्धकौशल्याचे प्रभावी प्रदर्शन सादर केले जाईल. याद्वारे त्यांचे शौर्य, शिस्त आणि आत्मविश्वास प्रकट होईल. राष्ट्रीय सुरक्षेत विशेष योगदान दिले आहे असे रामपूर हाउंड आणि मुधोल हाउंड हे स्वदेशी श्वान आपली कौशल्ये सादर करतील. विशेष म्हणजे, अखिल भारतीय पोलीस श्वान स्पर्धेत विजेती ठरलेली 'मुधोल हाउंड रिया' या वर्षीच्या परेडमध्ये डॉग स्क्वाडचे नेतृत्व करेल. याशिवाय, गुजरात पोलिसांचे घोडदळ, आसाम पोलिसांचा मोटरसायकल डेअरडेव्हिल शो, सीमा सुरक्षा बल चे उंटदळ आणि उंट बँड, तसेच एनसीसी कॅडेट्स आणि शालेय बँड "एकतेतच शक्ती आहे" हा संदेश देत परेडमध्ये सहभाग घेतील. भारतीय वायुदलाच्या सूर्यकिरण पथकाकडून सादर होणारा भव्य एअर शो या परेडच्या भव्यतेत आणखी भर घालेल.

**"विविधतेत एकता" संदेश देणारे संचलन**

राष्ट्रीय एकता दिनी परेडमध्ये विविध राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश यांचे संचालन 'विविधतेत एकता' या विषयाचे दर्शन घडवतील.

या संचालनात राष्ट्रीय सुरक्षा गार्ड, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल, गुजरात, जम्मू आणि काश्मीर, अंदमान-निकोबार बेटे, मणिपूर, महाराष्ट्र, छत्तीसगड, उत्तराखंड आणि पुद्दुचेरी यांच्या संचालनाचा समावेश असेल

यासह सीमा सुरक्षा बल, केंद्रीय राखीव पोलीस दल, केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल, सशस्त्र सीमा बल, दिल्ली पोलीस आणि विविध राज्य पोलीस दलांचे ब्रास बँड कार्यक्रमाच्या उत्सवी वातावरणात अधिक रंग भरतील.

या परेडमध्ये केंद्रीय राखीव पोलीस दल चे पाच शौर्यचक्र विजेते आणि सीमा सुरक्षा बल चे १६ वीरता पदक विजेते सन्मानित केले जातील. या शूर जवानांनी नक्षलविरोधी आणि दहशतवादविरोधी मोहिमांमध्ये, तसेच पश्चिम सीमेवरील 'ऑपरेशन सिंदूर' दरम्यान, अद्वितीय धैर्य आणि पराक्रमाचे प्रदर्शन घडविले आहे.

परेडसोबतच भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयाद्वारे आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमात ९०० कलाकार भारतीय शास्त्रीय नृत्यांचे सादरीकरण करतील, ज्यातून भारताची समृद्ध सांस्कृतिक परंपरा आणि विविधतेतील सौंदर्य अधोरेखित होईल.

राष्ट्रीय एकता दिनाचे उद्दिष्ट नागरिकांमध्ये राष्ट्रीय एकता, सौहार्द आणि देशभक्तीची भावना दृढ करणे हे आहे.

हा उत्सव प्रत्येक भारतीयाला या मूल्यांचा स्वीकार करण्यासाठी आणि देशाच्या ऐक्याच्या भावनेला बळ देण्यासाठी प्रेरित करतो. १ ते १५ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत एकतानगर येथे 'भारत पर्व' आयोजित करण्यात येईल.



या पर्वात संपूर्ण भारतातील सांस्कृतिक सादरीकरणे आणि खाद्य महोत्सव आयोजित केला जाईल, ज्यामध्ये देशाच्या विविध परंपरांचा संगम पाहायला मिळेल. या पर्वाचा समारोप १५ नोव्हेंबर रोजी भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त विशेष कार्यक्रम आयोजित करून केला जाईल.

**- वर्षा फडके-आंधळे**

## जिल्हाधिकाऱ्यांकडून प्रस्तावित मतदान केंद्राची पाहणी

**दैनिक युवक आधार**
**रत्नागिरी, वार्ताहर**

नगरपरिषद/नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक -2025अनुषंगाने प्रभाग क्रमांक 7 मधील नगरपरिषद शाळा क्र.15 (दामले विद्यालय) येथे प्रस्तावित मतदान केंद्रांची किमान आवश्यक मूलभूत सुविधांच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी मनुज जिंदल यांनी आज पाहणी केली.

यावेळी त्यांच्यासमवेत जिल्हा सहआयुक्त तुषार बाबर, अधीक्षक न.पा.प्र. प्रविण माने, नगरपरिषद अभियंता यतिराज जाधव, वाहन विभाग प्रमुख जितेंद्र विचारे आदी उपस्थित होते.

# जागृती साखर कारखाना देणार ऊसाला प्रति टन ३१५१ भाव देणार

### जागृती शुगर्स अँड आलाईड इंडस्ट्रिज लि. तळेगाव भो. चा १४ वा.गळीत हंगाम

**दैनिक युवक आधार**
**प्रशांत तांबोळकर लातुर**

**लातुर :** मांजरा परिवारातील जागृती शुगर्स लि. तळेगाव यंदा शेतकऱ्यांना त्यांच्या ऊसाला प्रति टन ३१५१ रुपये किमान भाव देणार असल्याची घोषणा सहकारमहर्षी दिलीपराव देशमुख यांनी जाहीर केली आहे.जागृतीच्या १४ व्या गाळप हंगामाच्या शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते.




दहा लक्ष मेट्रिक टनापासून सुरु झालेला हा जागृतीचा प्रवास सत्तर लक्ष मेट्रिक टन उसाचे गाळप पर्यंत पोहचला आहे. कारखान्याच्या माध्यमातून आतापर्यंत पंधरा लाख कोटी रुपये शेतकऱ्यांना मिळाले आहेत.या कारखान्याच्या गाळप क्षमतेत देखील वाढ होणार असून आज अनेक कारखाने विक्रीसाठी काढले जात असताना सूक्ष्म आणि योग्य नियोजनाद्वारे मांजरा परिवाराने उत्तमरित्या कारखाने चालवून शेतकऱ्यांचा विश्वास संपादन केला आहे. ग्रॅन्युअल्स खत निर्मिती, ३२ मेगावॅट सोलार प्रकल्प यावर काम सुरु आहे. भविष्यात सल्फर विरहित साखर निर्मिती करणार असून एफआरपी पेक्षा ७० कोटीची ज्यादा रक्कम शेतकऱ्यांना दिलेली आहे.

**सर्वाधिक ऊस पुरवठा करणाऱ्या शेतकऱ्यांचा सत्कार..**

यावेळी सर्वाधिक उसपुरवठा करणारे घुगी सांगवी येथील शेतकरी, ट्रक, ट्रॅक्टर द्वारे उसपुरवठा करणारे यंत्रचालक ठकेदार, मुकदम, ऊसतोड कामगार यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी दिलीपराव देशमुख,सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, अशोकराव पाटील निलंगेकर, माजी आमदार वैजनाथ शिंदे, आबासाहेब पाटील सेलूकर, भगवानराव पाटील बस्वराज पाटील नागराळकर, मोईज शेख, अभय साळुंके,यशवंतराव पाटील रेना साखर, मल्लिकार्जुन मानकरी, विठ्ठल माकणे, विजयकुमार पाटील, शिवाजीराव केंद्रे, जेष्ट पत्रकार दै.यशवंतचे मुख्य संपादक बी. व्ही. मोतीपवळे, डी. एन. शेळके, माजी आमदार धर्माजी सोनकवडे, अभिजित देशमुख, विजय देशमुख, जगदीश बावणे, धनंजय देशमुख, दिलीप माने, सूर्यकांत कर्वा, विलास पाटील दिलीप पाटील नागराळकर,जागृतीचे उपाध्यक्ष लक्ष्मणरावजी मोरे, जनरल मॅनेजर गणेश येवले, इत्यादी मान्यवर उपस्थित होते. प्रस्ताविक जागृती चे उपाध्यक्ष लक्ष्मणरावजी मोरे, सूत्रसंचालन -सुधीर तोडकर आणि भगवान गायकवाड यांनी केले तर जनरल मॅनेजर गणेश येवले यांनी आभार मानले. सहकारातून आर्थिक समृद्धी साधनारे दिलीपरावजी हे दूरदृष्टी चे नेते असून त्यांच्या या दूरदृष्टी मुळे आज 20 हजार कुटुंबात आर्थिक क्रांती झालेली आहे. डिसलेरी, सीएनजी, विजउत्पादन, यासारखे प्रकल्प या ठिकाणी निर्माण झालेले आहेत. त्यामुळे अनेकांना रोजगार मिळाला आहे. त्यांच्या शिस्तबद्धतेमुळेच मी आज राज्याचा सहकारमंत्री आहे. उसाची एमएसपी वाढवण्यासाठी आम्ही केंद्राकडे मागणी केली आहे. कारखान्यासोबत जे जोडप्रकल्प असतील त्यांना इन्सेन्टिव्ह देण्याच्या योजनेवर काम चालू असून शासन सोयाबीन, ऊस, केळी, या पिकावर कृत्रिम बुद्धिमत्ता विकसित करण्यावर भर देत आहे शेतकऱ्यांनी त्याचा अधिक वापर करावा. त्यामुळे मातीपरीक्षण, बुरशी सारखे आजार , खताची मात्रा, जमिनीचा पोत, पाण्याची मात्रा, इत्यादी बाबी मध्ये मदत होणार होणार असल्याचे बाबासाहेब पाटील यांनी यावेळी सांगितले.

## परतीच्या पावसामुळे भात पिक पाण्याखाली ; शेतकरी हवालदिल

### शेतकऱ्याला १०० % नुकसान भरपाई मिळावी - संजय जांभळे

### अतिवृष्टीमुळे पेण तालुक्यात भातशेतीचे मोठे नुकसान

**दैनिक युवक आधार**
**पेण दीपक लोके**



परतीच्या पावसाने पेण तालुक्यातील शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. हाता तोंडाशी आलेला घास पाण्यात भिजल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. पावसामुळे शेतात पाणी साचले आणि शेतात कापून ठेवलेले भाताचे पीक भिजून नुकसान झाल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे.या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना १००% नुकसान भरपाई मिळावी यासाठी रायगड जिल्हा परिषदेचे माजी अर्थ व बांधकाम सभापती संजय जांभळे , सुनील धामणकर तालुका अध्यक्ष वंचित आघाडी,यांनी पुढाकार घेतला असून त्यांनी तहसीलदार आणि प्रांताधिकारी यांना निवेदन दिले आहे.यावर्षी पावसाने चांगलाच धुमाकूळ घातला असल्याने शेतकरी चिंतेत आहे. गेले सहा महिने मे ते ऑक्टोबर ऑक्टोबर महिन्यात पेण तालुक्यात परतीच्या पावसाने भातशेतीच मोठे नुकसान झाले आहे. भातकापणीचा हंगाम सुरू असतानाच अचानक आलेल्या पावसाने उभे पीक आता आडवे होऊन पाण्यात आक्षरशा भिजले आहे. वर्षभराची मेहनत ही पाण्यात गेल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे.शेतकऱ्यांना जी तुटपुंजी मदत मिळत आहे ती हेक्टरी मागे न ठेवता एकरी मागे मिळावी तसेच वाढीव मदत मिळावी यासाठी जिल्हा परिषद माजी अर्थ व बांधकाम सभापती संजय जांभळे हॅलो वंचित आघाडीचे तालुका अध्यक्ष सुनील धामणकर यांनी प्रशासनाकडे मागणी केली असून राहिलेल्या शेतकऱ्यांना लवकरात लवकर भरपाई मिळावी यासाठी स्थानिक प्रशासन व जिल्हा प्रशासनाला पत्र देण्यात आले आहे.

# अंभोरा फाट्यावरील साई हॉटेल - स्वादिष्ट वडापाव भेळ मिसळची खास ओळख!

**दैनिक युवक आधार**
**अंभोरा (ता. आष्टी):बाळासाहेब रकटाटे**

मुंबई, पुणे आणि कोल्हापूर या ठिकाणी वडापाव आणि भेळ यांची चव प्रसिद्ध आहे, हे आपण सर्वांनी ऐकले आहे. मात्र आता त्या चवीची आठवण करून देणारे ठिकाण आष्टी तालुक्यातील अंभोरा फाटा येथेही निर्माण झाले आहे.येथील 'साई हॉटेल – नाश्ता अँड रसवंत गृह' हे गेल्या दोन वर्षांत परिसरातील लोकप्रिय नाश्त्याचे ठिकाण ठरले आहे.अहिल्यानगर–बीड मुख्य रस्त्यालगत असलेल्या या हॉटेलमध्ये सकाळपासूनच ग्राहकांची वर्दळ असते.




गरमागरम वडापाव, मिसळपाव, भजी, चहा, लस्सी आणि कोल्डड्रिंक्स यांच्या अप्रतिम चवीने या ठिकाणी रोज गर्दी उसळते.हॉटेलचे मालक जलील पठाण यांनी आपल्या मेहनतीने आणि प्रामाणिक सेवेने अल्पावधीतच हॉटेलला प्रसिद्धी मिळवून दिली आहे. विशेष म्हणजे, या उपक्रमातून दोन ते तीन युवकांना रोजगाराची संधी मिळाली आहे. त्यामुळे स्वादासोबतच समाजकारणाची छापही या हॉटेलने उमटवली आहे.

अंभोरा, सालेवडगाव, नांदूर सुलेमान, देवळा आणि नांदूर परिसरातील नागरिक सकाळच्या नाश्त्यासाठी इथे हमखास थांबतात."साई हॉटेलचा वडापाव म्हणजे दिवसाची ऊर्जा!" असं अनेक ग्राहक हसत सांगतात.स्वच्छता, मनमिळावू सेवा आणि दर्जेदार चव या तीन गुणांमुळे साई हॉटेलने ग्रामीण भागात शहरासारखी चव आणि वातावरण निर्माण केलं आहे.

आज हे हॉटेल केवळ नाश्त्याचे केंद्र राहिले नाही, तर स्थानिक युवकांसाठी रोजगार, भेटीगाठी आणि चवीचा उत्सव बनले आहे.अंभोरा फाट्यावर ग्राहकांची सतत गर्दी असलेले 'साई हॉटेल' — स्वादिष्ट वडापाव आणि मिसळपावसाठी प्रसिद्ध ठिकाण.

**दोन वर्षांपूर्वी सुरू झालेलं 'साई हॉटेल' अल्पावधीत लोकप्रिय**

दररोज परिसरातील गावांमधून ग्राहकांची गर्दी दर्जेदार वडापाव, मिसळपाव, भजी, लस्सी आणि चहा यांची उत्तम सोय

स्थानिक दोन ते तीन युवकांना रोजगाराची संधी स्वच्छ वातावरण आणि मनमिळावू सेवा – यशाचा पाया- हॉटेलचे नाव: साई हॉटेल – नाश्ता अँड रसवंत गृह मालक: श्री. जलील पठाण

ठिकाण: अंभोरा फाटा, ता. आष्टी, जि. बीड विशेष पदार्थ: वडापाव, मिसळपाव, भजी, पोहे, चहा, दूध, लस्सी, कोल्डड्रिंक्स ग्रामीण फाट्यावर सुरू झालेलं हे छोटं हॉटेल आज स्वाद, सेवा आणि रोजगाराचं प्रतीक ठरलं आहे. 'साई हॉटेल'ने दाखवून दिलंय की, प्रामाणिक प्रयत्नांनी छोटा व्यवसायही मोठं यश मिळवू शकतो.

हॉटेल हे सध्या परिसरातील चविष्ट नाश्त्यासाठी प्रसिद्ध ठिकाण बनले आहे. सकाळी लवकर उठणारे प्रवासी, विद्यार्थी आणि कामगार यांची येथे नेहमीच गर्दी असते. कारण एकच — इथल्या वडापावची अप्रतिम चव स्वच्छ वातावरण, ताजे पदार्थ आणि मनमिळावू सेवा — या त्रिसूत्रीवर साई हॉटेलने ग्राहकांचा विश्वास जिंकला आहे. त्यामुळेच आज अंभोरा फाट्यावरून जाणारा प्रत्येक प्रवासी एकदा तरी या ठिकाणी थांबून चविष्ट वडापावचा आस्वाद घेताना दिसतो.

## सरपंच सतीश पाटील यांना राज्यस्तरीय ग्रामरत्न पुरस्कार देऊन सन्मान

**दैनिक युवक आधार**
**पेण दीपक लोके :**

पेण मधील कलवे गावातील सरपंच सतीश नारायण पाटील यांना अखिल भारतीय सरपंच परिषद यांच्याकडून राज्यस्तरीय ग्रामरत्न सरपंच पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.




सदर पुरस्कार अखिल भारतीय सरपंच परिषदेचे अध्यक्ष मा. जयंत सर्जेराव पाटील, संभाजी ब्रिगेडचे विकास आबा पाटील, आय एस ओ लीड ऑडिटर किरण भगत सर, ग्रामपंचायत मुख्याधिकारी यांच्या हस्ते सरपंच सतीश नारायण पाटील यांचा अखिल भारतीय सरपंच परिषद यांच्याकडून राज्यस्तरीय ग्राम रत्न सरपंच पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

कलवे गावातील सरपंच सतीश नारायण पाटील यांनी सरपंच पदाची धुरा घेतल्यानंतर अनेक विविध कामांना गती देत गावातील रस्ते, पाणीपुरवठा योजना, गावातील स्वच्छता, गावांमधील एकोपा, गावातील अंतर्गत रस्ते, असे विविध योजना आणून गावाला सुजलाम सुफलाम बनवण्यात सरपंच आणि त्यांची सर्व सदस्य कमिटी मेंबर यशस्वी झाली आहेत. यामुळेच सरपंच सतीश नारायण पाटील यांना राज्यस्तरीय ग्रामरत्न सरपंच पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

सदर सन्मान झाल्यानंतर खासदार धैर्यशील पाटील, आमदार रवी शेठ पाटील, जिल्ह्याचे महामंत्री वैकुंठ शेठ पाटील, जिल्हाप्रमुख सतीश धारप,, भारतीय जनता पार्टीचे तालुका अध्यक्ष श्रीकांत पाटील सर, सरचिटणीस मिलिंद पाटील, आदींसह भारतीय जनता पार्टी व विविध क्षेत्रातील सरपंच उपसरपंच कार्यकर्ते यांनी सरपंच सतिशनारायण पाटील यांचे अभिनंदन

## सोलापूर-तुळजापूर-धाराशिव नवीन ब्रॉडगेज रेल्वे मार्गासाठी १६४७.८७ कोटी रुपये अधिकचा निधी देणार

**दैनिक युवक आधार**
**मुंबई संतोष पाटील**

सोलापूर-तुळजापूर-धाराशिव या नवीन रेल्वे ब्रॉडगेज रेल्वे मार्ग प्रकल्पाकरिता ३ हजार २९५.७४ कोटी रुपयांच्या सुधारित अंदाजपत्रकास अध्यक्षस्थानी असलेल्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

यानुसार या प्रकल्पाच्या खर्चाच्या ५० टक्के हिस्सा म्हणजेच १ हजार ६४७ कोटी ८७ लाख रुपयांचा अधिकचा निधी देण्यास मान्यता देण्यात आली.

यामुळे साडे तीन शक्तीपीठांपैकी एक असलेले तुळजापूर शहर शक्तीपीठ रेल्वे मार्गाशी जोडले जाणार आहे.

यामुळे विविध राज्यातून येणाऱ्या भाविकांची सोय होणार आहे.

राज्याच्या ग्रामीण भागातील रेल्वे प्रकल्पांना गती मिळावी यासाठी ५० टक्के आर्थिक सहभागाचे धोरण शासनाने स्वीकारले आहे.

धाराशिव जिल्ह्यातील तुळजापूर येथे तुळजा भवानी मातेच्या दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भाविक येतात. या भाविकांची सोय व्हावी यासाठी सोलापूर-तुळजापूर-उस्मानाबाद हा रेल्वेमार्ग ब्रॉडगेज करण्यात येत आहे. यासाठी एकूण प्रकल्प खर्चाच्या ५० टक्के म्हणजे ४५२.४६ कोटी रुपयांच्या आर्थिक सहभागास १० फेब्रुवारी २०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार मान्यता देण्यात आली आहे. मात्र आता विविध कारणामुळे सदर प्रकल्पाच्या खर्चात वाढ झाल्यामुळे रेल्वे प्रशासनाने ३ हजार २९५ कोटी ७४ लाख रुपयांचे सुधारित अंदाजपत्रक सादर केले आहे.

यामध्ये १ हजार ६४७ कोटी ८७ लाख रुपयांचा राज्य शासनाचा हिस्सा देण्याची विनंती केली आहे.

त्यानुसार सुधारित अंदाजपत्रकास आणि राज्य शासनाच्या हिस्सा देण्यास मान्यता आली. ही रक्कम टप्प्याटप्प्याने केंद्र सरकारला उपलब्ध करुन देण्यात येईल.

## ना. प्रविणभाऊ दरेकर यांची ग गृहनिर्माण स्वय- समूह अध्यक्ष पदी नियुक्ती झाल्याबद्दल मराठा महासंघ मुंबई च्या वतीने सत्कार

**दैनिक युवक आधार**
**मुंबई प्रतिनिधी**

महाराष्ट्र गृहनिर्माण स्वयं- समूह पुनर्विकास प्राधिकरण मा.ना. प्रविणभाऊ दरेकर यांची नियुक्ती झाल्याबद्दल अध्यक्ष पदग्रहण समारंभ मंगळवार दिनांक २८ ऑक्टोंबर २०२५ रोजी दुपारी ०२:०० वाजता, कक्ष क्रमांक ४०३, तिसरा मजला, गृहनिर्माण भवण, कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई ५१ येथे संपन्ना झाला.

याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून ना. चंद्रशेखर बावनकुळे महसूलमंत्री, एड. आशिष शेलार पालकमंत्री मुंबई उपनगर, ना पंकज भोयर गृहनिर्माण व सहकार राज्यमंत्री ,ना. प्रसाद लाड आमदार विधानपरिषद उपस्थित होते.



त्याचबरोबर मुंबईतील अनेक सामाजिक संस्था, मुंबई बॅक सभासद, सहकार भारती सभासद सह अखिल भारतीय मराठा महासंघ मुंबई विभागीय अध्यक्ष रुपेश मालुसरे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व पदाधिकारी उपस्थित राहून ना. प्रविणभाऊ दरेकर यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी महासंघाचे प्रविणभाऊ पवार कोकण विभागीय अध्यक्ष, सतिश जाधव उत्तर मध्य जिल्हाध्यक्ष, विजय बागवे, संतोष राणे, हरेश मालुसरे, अनिल शेलार, मोहन सावंत, प्रकाश निपाणी, विनोद शिंदे सह आदी सर्व मंडळी उपस्थित होते.

## काळसेकर टेक्निकल कॅम्पसमध्ये वाचन प्रेरणा दिवस उत्साहात

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर)**

अंजुमन-इ-इस्लामच्या काळसेकर टेक्निकल कॅम्पस (न्यू पनवेल येथील केंद्रीय ग्रंथालयाने वाचन प्रेरणा दिवस आयोजित केला होता. हा उपक्रम भारताचे लोकनायक आणि मिसाईल मॅन डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड, आजीवन शिक्षणाची सवय आणि बौद्धिक जिज्ञासा वाढवणे हा होता. या कार्यक्रमाला ३०० हून अधिक विद्यार्थी आणि शिक्षकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. दिवसाची सुरुवात निवृत्त डॉ. काशिनाथ देवधर (वरिष्ठ शास्त्रज्ञ डी. आर.डी.ओ) यांच्या प्रेरणादायी व्याख्यानाने झाली.या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून, ग्रंथालयाने सर्वोत्तम ग्रंथालय वाचक पुरस्कार २०२४-२५ वितरित केले. प्रत्येक शाळेतील एक विद्यार्थी आणि एक शिक्षक अशा दोघांना वाचनातील समर्पण आणि ग्रंथालयातील सक्रिय सहभागाबद्दल गौरविण्यात आले. कार्यक्रमात शिक्षक लेखकांच्या पुस्तकांचे प्रकाशनही करण्यात आले. २०२५ मधील त्यांच्या शैक्षणिक योगदान आणि प्रकाशनांचा गौरव करण्यात आला. हा कार्यक्रम शाहीन मोमीन (ग्रंथपाल) आणि त्यांच्या ग्रंथालय संघाच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला. अंजुमन-इ-इस्लामचे अध्यक्ष डॉ. झहीर आय काझी (पद्म पुरस्कारप्राप्त), नवी मुंबई संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष बुरहान हारिस, अंजुमन इ-इस्लाम, कॅम्पस डायरेक्टर डॉ. रमजान खाटीक, डीन, स्कूल ऑफ फार्मसी डॉ. शारिक सय्यद, डीन, स्कूल ऑफ इंजिनीअरिंग, डॉ. राजेंद्र मगर, डीन, स्कूल ऑफ आर्किटेक्चर प्रा. राज म्हात्रे यांच्यासह सर्व विभागप्रमुख, नियंत्रक आणि समन्वयक कार्यक्रमाच्या भव्य यशात मोलाची भूमिका बजावली.

## फलटण उपजिल्हा रुग्णालयातील महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरणी दोषींवर कठोर कारवाई व्हावी..!

**दैनिक युवक आधार**
**भडगांव (प्रतिनिधी)उमेश पाटील :** बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्याची रहिवासी असलेली फलटण उपजिल्हा रुग्णालयातील महिला डॉक्टरच्या आत्महत्येस जबाबदार असलेले पो. नि. गोपाल बदने व प्रशांत बनकर यांचेवर कठोर कारवाई करून शिक्षा करावी. सदर महिला डॉक्टरने भाऊबीजेच्या दिवशीच दि. २३/१०/२०२५ रोजी आत्महत्या केली. तत्पूर्वी तिने आपल्या हातावर सुसाइड नोट लिहिली आहे. त्यानुसार तिच्यावर चारवेळा अत्याचार झाले. मानसिक त्रास दिला गेला. तिचे वडील अत्यंत गरीब शेतकरी आहेत. या परिवाराचा आधार गेला. मृत महिला डॉक्टरला न्याय मिळावा. व परिवारास आर्थिक व मानसिक आधार द्यावा. सखोल चौकशी करून आरोपींना कठोर शिक्षा व्हावी. जर नोकरी करणाऱ्या महिलाच सुरक्षित नसतील तर इतर महिलांचे काय ? अशा घटना घडू नयेत यासाठी वेळीच पायबंद व्हावा. यासाठी पाठपुरावा करावा. अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल. अशा शब्दात सदर घटनेचा तीव्र शब्दात निषेध करून शेतकरी संघ संचालिका मा. नगरसेविका योजना पाटील, अभिनव संस्थेच्या अध्यक्षा डॉ. सुवर्णा पाटील, शिवप्रेरणा संस्थेच्या अध्यक्षा मिना बाग, सचिव मनिषा पाटील, सदस्या रेखा शिरसाठ आदी महिला पदाधिकारींनी तहसीलदार शितल सोलाट व पोलिस निरीक्षक महेश शर्मा यांना दिले.



सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

## वंचित बहुजन आघाडीचे नवनिर्वाचित जालना पूर्व जिल्हाध्यक्ष रामप्रसाद थोरात सर व जिल्हा कमिटीचा परतूर तालुका कमिटी व शहर कमिटीने केला सत्कार



**दैनिक युवक आधार**
**परतूर-जालना(अशोक ठोके)**

आज परतुर तालुक्याच्या वतीने वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष रविंद्रजी भदर्गे यांच्या अध्यक्षतेखाली शासकीय विश्रामगृह परतुर येथे नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष रामप्रसाद थोरात सर व जिल्हा कमिटीचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता,त्याचबरोबर तालुक्याच्या वतीने नवनिर्वाचित पोलीस पाटील म्हणून शेवग्याचे विजयराज नाथभजन तर सिंगोना येथील पोलीस पाटील म्हणून नंदकिशोर गरड हे स्पर्धा परीक्षेत उत्तीर्ण झाले आहेत त्यांचाही सत्कार रामप्रसाद थोरात सर व महासचिव डॉ.किशोर त्रिभुवन यांच्या हस्ते करण्यात आला तर नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष रामप्रसाद थोरात सर यांचा सत्कार रविंद्र भदर्गे यांनी केला डॉ. किशोर त्रिभुवन यांचा सत्कार महादेव पैठणे, जिल्हा सचिव जमीरभाई यांचा सत्कार दीपक हिवाळे यांनी केला

या कार्यक्रमाला वंचित बहुजन आघाडीचे ज्येष्ठ नेते चोखाजी सौंदर्य, गुलाब दवडे,गौतम खंडागळे, शिवाजी डोळस,एकनाथ टोणपे, हनुमंत मोरे गुलाब नाथभजन, बाळू झोटिंगे,आकाश साळवे,राहुल पहाडे स्वप्निल पहाडे, प्रमोद शिरसाट वअनेक पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वंचित बहुजन आघाडीचे शहराध्यक्ष राहुल नाटकर यांनी केले.

# श्री पाणबुडी देवी कलामंच ( मुंबई ) तर्फे कोकणच्या नमन लोककलेचे आयोजन

**बळीवंश कलामंच ( ता. गुहागर, जि. रत्नागिरी ) निर्मित नमन प्रयोगात नवीन कलाकृती "संस्कार" चे होणार सादरीकरण**







**दैनिक युवक आधार**
**मुंबई (शांताराम गुडेकर)**

सांस्कृतिक वारसा लाभलेल्या महाराष्ट्राला लोककलेची फार मोठी परंपरा आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत विविध लोककलेच्या माध्यमातून समाजप्रबोध करत जनजागृती करण्याचे महान कार्य अनेक लोकशाहीर, लोककलावंतांनी केला आहे आणि म्हणूनच महाराष्ट्राला गौरवशाली सांस्कृतिक - परंपरा कायम आहे.महाराष्ट्रातील अनेक लोककला काळानुसार लोप पावत चालल्या असताना कोकणात अनेक गाव-वाडी कुशीत काही लोककला फक्त सणासुदीलाच सादरीकरण होत असून त्या मर्यादित न ठेवता त्या मध्ये पारंपरिक आणि आधुनिक समतोल साधून त्या जिवंत राहिल्या पाहिजेत, व्यावसायिक झाल्या पाहिजेत यासाठी कोकणातील बरेच लोक आपआपल्या प्रमाणे प्रयत्न करीत आहेत.

त्यापैकीचं एक कोकणात नावलौकिक मिळवलेले बळीवंश कलामंच ( ता. गुहागर,जि. रत्नागिरी ) हा कलामंच आहे.आयोजनातील अग्रेसर असणाऱ्या श्री पाणबुडी देवी कलामंच तर्फे कोकणातील बहुप्रिय लोककला नमन कलेचा या मोसमातील शुभारंभाचा प्रयोग मंगळवार दि.११ नोव्हेंबर २०२५,रोजी रात्रौ ८.३० वा. मा. दिनानाथ मंगेशकर नाट्यगृह विलेपार्ले, (पूर्व) मुबंई येथे आयोजित करण्यात आला आहे.

कार्यक्रम दरम्यान श्री. संदीप तुकाराम सावंत,श्री.सतिश रामचंद्र जोशी यांना श्री.पाणबुडी देवी ,मुंबई पुरस्कृत स्व.शंकर ( दादा ) गोमाणे स्मृती प्रित्यर्थ नमन लोककला गौरव पुरस्कार - २०२५ तर श्री.अनंत अशोक शेनॉय यांना श्री.पाणबुडी देवी कलामंच,मुंबई पुरस्कृत स्व.शंकर ( दादा ) गोमाणे स्मृती प्रित्यर्थ भजन सम्राट पुरस्कार - २०२५ देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.शिवश्री सागर बबन डावल या नवोदित नमन कलावंत यांनी अल्पवधीत अनेक वगनाट्य लेखन केले आहे.त्यातीलच नवी कलाकृती "संस्कार" यावेळी पहायला मिळेल.समाजप्रबोधन विषयक लिखाण मधून ते कायम वेगवेगळे संदेश देण्याचे काम ते करत आले आहेत. अथक परिश्रम पूर्वक निर्मितीतून साकारलेल्या या नमन प्रयोगाला कोकणवासीय मुंबईकर यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

अधिक माहितीसाठी दिपक कारकर- ९९३०५८५१५३,रमेश भेकरे-९५९४३५२८६३,संतोष घाणेकर-९८३३६८९६४२,रमेश कोकमकर - ८८५०४२२७११ यांच्याशी संपर्क साधवा.

## "चला पाहुयात गडकिल्ले" — इतिहास जाणण्याचा उपक्रम

**दैनिक युवक आधार**
**खेड:-(प्रमोद तरळ)**

छत्रपती साम्राज्य जाधववाडी यांच्या नेतृत्वाखाली यशवंत विद्यालयात शिवजन्मोत्सवा निमित्ताने १६ /०२/२०२५ रोजी शिवशंभू विशेष ज्ञान स्पर्धा (MCQ) घेण्यात आली.तसेच या स्पर्धेत उत्तीर्ण होणर्या प्रथम ३० विद्यार्थ्यांना गड दर्शनाची संधी देण्यात आली.ठरल्याप्रमाणे छत्रपती साम्राज्य संघटनेने "चला पाहुयात गडकिल्ले" हा विशेष उपक्रम राबविण्यात आला. हा उपक्रम १९ ऑक्टोबर २०२५ रोजी किल्ले रसाळगड येथे पार पडला.रसाळगडाची इतिहास गडाची संपूर्ण माहिती तसेच आजूबाजूच्या किल्ल्यांची माहिती संघटने मार्फत देण्यात आली.

या उपक्रमाचा मुख्य उद्देश येणाऱ्या तरुण पिढीला छत्रपती श्री शिवाजी महाराज आणि छत्रपती श्री संभाजी महाराज यांचा गौरवशाली इतिहास सांगणे व समजावून देणे हा होता.कार्यक्रमाला विद्यार्थ्यांनी तसेच धामणंद जाधववाडीतील ग्रामस्थांनी व यशवंत विद्यालयातील शिक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.गडदर्शन आणि इतिहासाच्या प्रेरणादायी गोष्टींमुळे विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती आणि अभिमानाची भावना दृढ झाली.

## वादळाची सावधगिरी: रायगड किनारपट्टीवरील सर्व मच्छिमार नौका सुरक्षित

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

रेवदंडा-अलिबाग किनारा सज्ज, रायगड जिल्ह्यातील समुद्र किनारपट्टीवर निर्माण झालेल्या वादळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर प्रशासन आणि मत्स्य व्यवसाय विभाग पूर्णपणे सज्ज झाले आहेत. जिल्ह्यातील एकूण 2974 मच्छिमार नौका सुरक्षितपणे किनाऱ्यावरपरतल्या आहेत. सध्या कोणतीही नौका बेपत्ता नसल्याची खात्री मत्स्य व्यवसाय अधिकाऱ्यांनी दिली आहे. रेवदंडा-अलिबाग परिसरात मच्छिमारांनी वेळेवर नौका बंदरात आणल्याने मोठा दिलासा जिल्हा



प्रशासनाला मिळाला आहे. स्थानिक बंदरावर मच्छिमारांनी नौका सुरक्षित ठेवत हवामान सुधारण्याची प्रतीक्षा सुरु केली आहे. सतत येणाऱ्या वादळाच्या इशाऱ्यांमुळे सागरी सुरक्षा दल आणि मत्स्य व्यवसाय विभागाने किनाऱ्यावर चौकस नजर ठेवली आहे. श्रीवर्धन, मुरुड-जंजिरा, अलिबाग आणि उरण तालुक्यातील सर्व बंदरांवर नौका नांगरून आहेत. मुरुड-जंजिरा तालुक्यात 700, श्रीवर्धनमध्ये 1019, अलिबागमध्ये 800 आणि उरण तालुक्यात 450 नौका सुरक्षित आहेत. करंजा बंदरातून आणखी पाच नौका संध्याकाळपर्यंत परत येणार आहेत, अशी माहिती स्थानिक मच्छिमार संस्थेने दिली.सहाय्यक आयुक्त, मत्स्य व्यवसाय विभाग, रायगड यांनी सांगितले की, खोल समुद्रात जाणे सध्या टाळावे. मच्छिमारांनी हवामान खात्याच्या सूचनांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन त्यांनी केले. विभागाने सर्व मच्छिमार सहकारी संस्थांना सतर्कतेचा इशारा देऊन किनाऱ्यावर आवश्यक तयारी ठेवण्यास सांगितलेआहे.स्थानिक पातळीवर रेवदंडा-अलिबाग किनाऱ्यावर मोठ्या प्रमाणात सतर्कता वाढवण्यात आली असून, गावकऱ्यांनी एकजुटीने तयार ठेव केली आहे.नागरिकांनी समुद्रकिनारी गर्दी न करता सुरक्षित ठिकाणीच राहण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. आगामी 24 तास हवामान बदलते राहण्याची शक्यता असून विभाग सर्व हालचालींवर लक्ष ठेवून आहे.

रेवदंडा येथील अनुभवी मच्छिमार मनोज जंगली यांनी सांगितले, "समुद्रावर वाळवंटासारखी स्थिती असते. वारा वाढला की एक क्षणात संकट येते. पण यावेळी प्रशासनाने वेळेवर सूचना दिल्या आणि आम्ही नौका परत आणल्या, म्हणून आज सगळे सुखरूप आहोत."

# नाशिक-दिल्ली विमानसेवेचा शुभारंभ खासदार भगरे यांची ऐतिहासिक उड्डाण!

### खा.भास्कर भगरे कृषी मंत्र्यांची भेट घेऊन मांडणार शेतकऱ्यांच्या विविध समस्या

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी- कृष्णा गायकवाड**

**(पिंपळगाव बसवंत)** : नाशिककरांसाठी आजचा दिवस ऐतिहासिक ठरला आहे. दीर्घ प्रतीक्षेनंतर नाशिक ते दिल्ली दरम्यानची नियमित विमानसेवा आज सोमवार पासून सुरू झाली आहे.



ही सेवा सुरू करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणारे डिंडोरी लोकसभा मतदारसंघाचे लोकप्रिय खासदार भास्कर भगरे सर यांनी आज या पहिल्याच उड्डाणाने दिल्लीकडे प्रयाण केले. दिल्ली येथे ते केंद्रीय कृषी मंत्री श्री. शिवराज सिंह चौहान यांची भेट घेऊन शेतकऱ्यांच्या विविध समस्या मांडणार आहेत.

खासदार भगरे सर यांनी सांगितले, "नाशिक-दिल्ली विमानसेवा सुरू व्हावी यासाठी मी सातत्याने प्रयत्न केले. आज त्या प्रयत्नांना यश मिळाले आहे. हे माझ्यासाठी अभिमानाची बाब आहे.


या उड्डाणाद्वारे मी दिल्लीला जात असून, केंद्रीय कृषी मंत्र्यांसमोर महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या समस्या मांडणार आहे. तसेच अलीकडील अस्मानी-सुलतानी संकटामुळे अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी आवश्यक मदतीची मागणी केंद्र सरकारकडे करणार आहे."

या ऐतिहासिक प्रवासात खासदार भगरे सर यांच्यासोबत नाशिक लोकसभेचे माजी खासदार राजाभाऊ वाजे, सहाय्यक समूहाचे विलास आण्णा शिंदे तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते.भास्कर भगरे सर यांचे प्रयत्न आणि नाशिक-दिल्ली विमानसेवेचा शुभारंभ हा नाशिककरांसाठी आज अभिमानाचा क्षण आहे.

# लेखिका सौ. अरुणा अजित भागवत यांच्या दोन पुस्तकांची निवड

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या ग्रंथालय संचालनालयाच्या ग्रंथ निवड समितीने २०२३ मध्ये प्रकाशित उत्तम, दर्जेदार ग्रंथांची यादी जाहीर केली आहे. या उत्तम, दर्जेदार ग्रंथांच्या यादीत रायगड येथील लेखिका सौ अरुणा अजित भागवत यांची इसाप प्रकाशन,नांदेड यांनी प्रकाशित केलेली दोन पुस्तके निवडण्यात आली आहेत.






आय. एस. बी. एन. नंबर असलेली तसेच उत्तम साहित्य ,सकारात्मक विचार करायला शिकविणारी आणि व्यक्तिमत्त्व विकासाला मदत करणारी पुस्तके वाचकांना मिळावीत यासाठी या पुस्तकांची निवड करण्यात आलेली आहेत.

यामध्ये रायगड जिल्ह्याच्या ख्यातनाम लेखिका सौ अरुणा अजित भागवत यांची 2023 मध्ये प्रकाशित झालेली दोन पुस्तके गुलाम (कथासंग्रह) आणि जंतर मंतर छू ( बालकथासंग्रह) हे निवडण्यात आले आहेत.

लेखिका सौ अरुणा भागवत यांच्या याआधीच्या दोन पुस्तकांना देखील महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ याच्या उत्कृष्ट वाङ्मय निर्मिती पुरस्कार प्राप्त झाला आहे. २००६ यावर्षी या लाडक्या मुलांनो या पुस्तकास साने गुरुजी पुरस्कार व २०१३ यावर्षी आनंद फुलवू या या पुस्तकाला भा. रा. भागवत पुरस्कार राज्य सरकारच्या वतीने देण्यात आला.

या पुस्तकाच्या निवडीने रायगड जिल्ह्याच्या शिरपेचात पुन्हा एकदा मानाचा तुरा खोवला गेला. याप्रसंगी प्रकाशक, दत्ता डांगे, डॉ. नीलिमा मोरे, अरविंद मोरे, भूषण भागवत आणि स्वाती भागवत यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या भूषणावह बातमीमुळे संपूर्ण रायगड जिल्हाच नाही तर महाराष्ट्र राज्यात साहित्य क्षेत्रात आनंदाची लहर पसरली आहे. सर्वांकडून अभिनंदनाचा वर्षाव लेखिका सौ. अरुणा भागवत यांच्यावर होत आहे.

## सिनर्जी फिटनेसच्या नव्या शाखेसाठी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट



**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी सतीश कडू**

**नागपूर :** प्रसिद्ध सेलिब्रिटी ट्रेनर अजिंक्य वखरे यांच्या मालकीचा फिटनेस ब्रँड "सिनर्जी फिटनेस" आता आपल्या नव्या शाखेसह नागपुरात विस्तारत आहे. या नव्या शाखेचे वैशिष्ट्य म्हणजे तीसरी शाखा मा.देवेंद्र फडणवीस साहेबांच्या मतदारसंघात सुरू होत आहे. या निमित्ताने अजिंक्य वाखरे यांनी स्वतः फडणवीस साहेबांची भेट घेतली व त्यांना या नव्या उपक्रमाची माहिती दिली. अजिंक्य वखरे यांनी सांगितले की, नागपूरच्या इतिहासात पहिल्यांदाच एखाद्या जीमच्या स्वतःच्या शाखा उघडल्या जात आहेत, आणि हे सिनर्जी फिटनेससाठी एक मोठं पाऊल आहे. मा. फडणवीस साहेबांनी या उपक्रमाचे कौतुक करत सांगितले की, जर वेळ मिळाला तर या नव्या शाखेचे उद्घाटन त्यांच्या हस्ते करण्याची त्यांची इच्छा आहे. हि बाब सिनर्जी फिटनेस आणि संपूर्ण टीमसाठी अत्यंत अभिमानाची आहे.

## जिल्हास्तरीय कराटे स्पर्धेत पिरकोन हायस्कूलच्या वैदेहीने पटकावला प्रथम क्रमांक

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख एम.डी.भोईर**

अलिबाग येथील नुकत्याच आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेमध्ये कराटे विभागात क.भा.पाटील वि.पिरकोनच्या वैदेही घरत हिने उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला आहे. ही जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा २६/ १०/ २०२५ रोजी अलिबाग येथे आयोजित करण्यात आली होती. यामध्ये जिल्ह्यातील १५ तालुक्यामधून आलेल्या अनेक कराटे पटूनी सहभाग घेतला होता.वैदेही घरत हिने १७ वर्षे वयोगट आणि ५० ते ६० वजन गट यामध्ये भाग घेतला होता. सुरुवातीच्या फेऱ्यापासून वैदही घरत हीचा आत्मविश्वास वाखाणण्याजोगा होता प्रत्येक सामन्यात तिने प्रतिस्पर्धकावर वर्चस्व राखले.शेवटच्या क्षणापर्यंत उत्सुकता टिकून असलेल्या या लढतीत वैदहीने विजय मिळवून सुवर्णपदकावर आपले नाव कोरले आहे.

या यशाबद्दल शाळेच्या स्कूल कमिटीचे चेअरमन श्री जीवन गावंड साहेब, दहागाव माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष कृष्णा पाटील साहेब यांनी अभिनंदन केले.

रयत शिक्षण संस्थेच्या ,रायगड विभागाचे विभागीय अधिकारी श्री कोंगेरे एम. के. यांनी सुद्धा अभिनंदन केले. तसेच शाळेच्या प्राचार्य सौ ए.ए. पाटील मॅडम यांनी सांगितले की केवल अभ्यासातच नाही तर क्रीडा क्षेत्रात ही




आमचे विद्यार्थी चमकत आहेत याचा आम्हाला अभिमान आहे.तसेच विद्यालयाचे क्रीडा प्रमुख श्री. डाढाले बी.बी. सर यांनी खूप मेहनत घेतली, तसेच विद्यालयातील श्री. पाटील पी एम, श्री म्हात्रे एस आर, सौ. पाटील एस सी. सौ पाटील एम एस मॅडम आणि सर्व सेवक वृंद यांनी वैदेहीचे अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## कृषी विक्रेत्यांचे मत - "या निर्णयामुळे दुकानदारांचे मोठे नुकसान, शेतकऱ्यांनाही फटका"

**दैनिक युवक आधार**
**सोयगाव प्रतिनिधी विजय काळे**

**सोयगाव:**केंद्र सरकारने लागू केलेल्या साशी पोर्टल फेज-२ या नव्या प्रणालीच्या विरोधात आज सोयगाव शहरासह संपूर्ण तालुक्यातील कृषी सेवा केंद्रांनी एकदिवसीय लाक्षणिक बंद पाळला.या बंदमध्ये तालुक्यातील सर्व कृषी विक्रेते,सेवा केंद्र संचालक आणि शेतकरी सहभागी झाले होते. आंदोलन शांततेत पार पडले. कृषी विक्रेत्यांच्या म्हणण्यानुसार,साशी पोर्टल फेज-२ मुळे व्यवसायात अनावश्यक गुंतागुंत, परवानगी प्रक्रियेत वाढ आणि तांत्रिक अडचणी निर्माण होतील.यामुळे शेतकऱ्यांना वेळेवर बियाणे,खते आणि औषधे मिळण्यात विलंब होऊन उत्पादनावर परिणाम होईल,असा इशारा देण्यात आला आहे.यावेळी प्रगती कृषी केंद्राचे संचालक प्रमोद पाटील यांनी सांगितले की साशी पोर्टल फेज-२ ची अंमलबजावणी तात्काळ स्थगित करावी.कृषी विक्रेत्यांशी चर्चा करून नव्या धोरणाचा




पुनर्विचार करावा.शेतकऱ्यांना सुलभ सेवा मिळण्याची हमी सरकारने द्यावी.

**प्रतिक्रिया......**

"साशी पोर्टल फेज-२ हा निर्णय कृषी विक्रेत्यांसाठी नुकसानकारक आहे. या प्रणालीमुळे कामात विलंब होईल आणि शेतकऱ्यांनाही अडचण येईल.सरकारने हा निर्णय मागे घ्यावा."

**— किशोर पाटील,कृषी सेवा केंद्र संचालक,सोयगाव**

"या पोर्टलमुळे आमच्यासारख्या छोट्या विक्रेत्यांचे आर्थिक नुकसान होईल. शासनाने प्रत्यक्ष परिस्थिती जाणून घेऊन निर्णय घ्यावा."

**— आशिष काळे, कृषी सेवा केंद्र,सोयगाव**

"शेतकऱ्यांना बियाणे व खते वेळेवर मिळणार नाहीत. याचा थेट परिणाम त्यांच्या शेतीवर होईल."केंद्र सरकार शेतकरी विरोधी आहे....

**— पुनम परदेशी शेतकरी**

"केंद्र सरकारने निर्णय घेण्यापूर्वी कृषी व्यवसायिकांशी चर्चा करायला हवी होती. ग्रामीण भागात या प्रणालीचा त्रास जास्त होणार आहे."

**—प्रमोद पाटील, प्रगती कृषी विक्रेता केंद्र,सोयगाव**

# सिल्लोड येथे माजी विद्यार्थ्यांचा तब्बल 21 वर्षांनी रंगला स्नेह सोहळा

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी : योगेश पालोदकर**



**सिल्लोड :** दि. 26/10/2025 रोजी रामकृष्ण विद्यालय प्राथमिक आणि माध्यमिक शाळा, सिल्लोड या शाळेतील 2004 च्या बॅचचा स्नेह सोहळा हा तब्बल 21 वर्षांनी या शाळेत जमला. बालपणीच्या शाळेतील आठवणींना पुन्हा एकदा त्यानिमित्ताने उजाळा मिळाला.

या सोहळ्याचे अध्यक्ष स्थान कुलकर्णी सर यांनी भुषवले तसेच उप-अध्यक्ष म्हणून पी.जी. पवार सर यांनी स्विकारले. त्यांच्यासोबत सपकाळ सर, सोनवणे सर, पवार सर, पाटील सर आणि इतर गुरुजनांची उपस्थिती या सोहळ्याला लाभली.या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शाळेचे माजी विद्यार्थी रघुनाथ पदमे सर आणि रविंद्र वाघ सर यांनी सांभाळले. तर आभारप्रदर्शन संदीप वाकेकर यांनी मानले.कार्यक्रमा दरम्यान दिवंगत शिक्षक व विद्यार्थी यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

तसेच या संपूर्ण सोहळ्याचे नियोजन योग्य प्रकारे करून सर्व माजी विद्यार्थी तसेच सर्व शिक्षक वर्गास या कार्यक्रमास जमवण्यासाठी मोठे योगदान अविनाश गंगावणे यांचे होते.

**असा रंगला सोहळा**

सुरवातीला सर्व माजी विद्यार्थ्यांनी गुरुजनांवर फुलांचा वर्षाव करुन स्वागत केले. तसेच मानाचे मराठी फेटे बांधून सोहळा दिमाखदार बनवला. प्रत्यक्ष शाळेत शिक्षकांनी जीवनाचे धडे गिरविले तसेच बहुमोल मार्गदर्शन केले.

या सोहळयामध्ये, शाळेच्या माजी विद्यार्थ्यांपैकी गणेश गायकवाड,दीपक गोराडे, दिवेश पटेल, किरण चाटे, गोविंद साने, दीपक आगळे,मनोज शिंगणे, संदीप डिडोरे, वैभव बुटे, नितीन शिंगारे ,नरेश हीवाळे ,अतुल वडगावकर, गिरीश पोफळे, भाऊसाहेब बडक, , स्वप्निल आंबेकर ,आबासाहेब डावरे, गणेश राऊत,गोपाल बीलंगे, विकास दौड, राम सोनवणे, दयानंद संसारे,दीपक आर के ,संजय दुधे, रामदास पांढरे ,मुकेश सुरडकर, योगेश ताठे, संतोष गोरे, अमोल जगधने, किरण पांडव, राजू काकड,महेश वानखेडे,श्याम सोनवणे, अतुल आगरे, दिनेश इंगळे, सचिन जाधव, उमेश अनवेकर मनोज शिंदे,गोपाल चौधरी, शिवा वैद्य,अनुप मोरे ,अमोल गायकवाड, दिनेश गायकवाड, राहुल दौड़,रितेश पटेल ,रंजना डकले, वर्षा निकम ,तनुजा भंडारी, भारती फरकाडे, प्रतिभा पांडव ,सोनाली ताठे ,भारती ढेपले, दिपाली सुरडकर, भारती चाफे,,शितल हावळे, दिपाली जाधव, पुष्पांजली वाघ, सुवर्णा पाटील,उपस्थित होते.

# रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्याच्या शेतात घामाच्या धारेनंतर आता अश्रूंच्या धारा

## नभातील बरसणाऱ्या धारांमुळे शेतकऱ्यांच्या डोळ्यात अश्रूंचा पुर

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी**

अवकाळी पावसामुळे पिकांच्या कापणीला सुरुवात होत असतानाच पावसाने धुमाकूळ घातला आहे.रायगड जिल्हा म्हणजे" भाताचे कोठार" पण हेच भाताचे पीक जमीनदोस्त झाले असून त्याला पुन्हा कोंब आले आहेत. अवकाळी पाऊस शेतकऱ्यांच्या मुळावर उठला आहे .अशा परिस्थितीत शेतकरी चिंतेत सापडले आहेत. आठवड्याभरापासून दुपारी किंवा सायंकाळी ढगांच्या गडगडाटासह पाऊस सुरू होत आहे. त्यामुळे काढणीला आलेले पीक भिजल्याने ते पीक अनेक ठिकाणी खाली कोसळल्याने कुजण्याचा धोका निर्माण झाला आहे .ज्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे .कारण हाता तोंडाशी आलेले पीक वाया गेले आहे. आणि त्यांना मोठ्या नुकसानीला सामोरे जावे लागत आहे .

रायगड जिल्ह्यातील अवकाळी पावसामुळे उरण,पेण, पनवेल अलिबाग संपूर्ण रायगड जिल्ह्यात शेतकऱ्यांनी केलेली भात कापणी ही शेतात साचलेले पाणी कमी होत नसल्याने पाण्यात बुडालेले पीक कुजून त्याची चिखल माती झाली आहे अशा या अस्मानी संकटामुळे शेतकरी पूर्ण उध्वस्त झाला आहे शेतकरी सरकारी मदतीच्या प्रतीक्षेत आहेत.भात कापल्यानंतर ताबडतोब बांधणी करत आहेत. थेट कापणी करून लगेच भात झोडणी ,मळणी करत आहेत .आणि त्यामुळे शेतमजुरांची मागणी वाढल्याने शेतमजूरही मिळत नाही. शेतीच्या कामापेक्षा छोट्या मोठ्या कंपनीत किंवा इतर व्यवसाय करण्यासाठी तरुण वर्ग पुढे जात आहे. त्यामुळे शेतीच्या कामासाठी मजूरही मिळणे कठीण झाले आहे. शेतीच्या कामासाठी मजुरांना विनवणी करावी लागत आहे.

शेतामध्ये तयार झालेला भात पिकून परिपक्व झाला आहे परंतु उन्हाच्या उष्णतेने व अवकाळी पडणाऱ्या पावसामुळे भाताच्या लोंब्यांपासून दाणे अलग होत असल्याने यावर्षी पीक भरभरून आले असूनही हातात धान्य मिळणार की नाही? अशी स्थिती बळीराजाची निर्माण झाली आहे. निसर्गाच्या लहरीपणावर मात करून भात पिके जोमाने वाढवून शेतकरी आपल्या कष्टाने शेतजमीन मधून पीक घेण्यासाठी कष्ट करत आहे. परंतु निसर्गाचा हा कोप असा होत आहे



की हातातोंडाशी आलेला घास निसर्गाच्या अशा प्रकोपामुळे मिळेल की नाही? अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

महाराष्ट्र शासनाचा विदर्भ, मराठवाडा, उस्मानाबाद या ठिकाणी शेतकऱ्यांसाठी मदत दौरा ,नुकसानीची मदत जाहीर करण्यात येत आहे .पण कोकणातील शेतकऱ्यांना कितीही संकट आले निसर्गाचा कोप झाला तरीही कोकणावरील शेतकऱ्यांना शासनाकडून मात्र मदतीचा हात पुढे येत नाही.कोकणातील शेतकरी आत्महत्येचा विचार सुद्धा करत नाही. पण अशा शेतकऱ्यांना शासनाकडून मदतीचा हात कधी मिळणार?


शेतीच्या कामात शेती म्हणजे "जुगार" झाली आहे मजुरांची कमी असल्याने घरच्या घरीच भात कापणी व झोडणी करावी लागत आहे मजुरीचा दर सुद्धा ६००ते ८०० रुपयापर्यंत गेलेला आहे त्यामुळे शेतकऱ्याला शेतीचा खर्च परवडत नसल्याने शेतकरी घरच्या घरीच भात झोडणी सुरू करत आहे. अवकाळी पाऊस आणि रणरणत्या उन्हाची परवा न करता शेतात तयार झालेले धान्य घरी आणण्याची लगबग सुरू आहे . परंतु अवकाळी परतीच्या पावसाने सर्वत्र थैमान घातले असून कापलेले भात पीक पावसात भिजले आहे तर काही ठिकाणी भात पिके पडले असल्याने ती कुजण्याची शक्यता निर्माण झाली आहे.अवकाळी पावसाने शेतीचे नुकसान पाहता सरकारने तात्काळ पंचनामे करून नुकसान भरपाई देण्याची अत्यंत गरज आहे परंतु केवायसी फार्मर आयडी या नियम अटी अशा निकषांमुळे शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळेल का नाही याची शेतकऱ्याला खंत वाटत आहे त्यामुळे शेतकरी वर्ग चिंतेत आहे.पावसाच्या कोसळणाऱ्या धारा शेतकऱ्यांच्या डोळ्यात मात्र अश्रूंचा महापूर आणत आहेत.

# कनकेश्वर फाटा ते कार्लेखिंड मार्गाची दयनीय अवस्था

## ठेकेदार, पुढारी आणि प्रशासनाचा संगनमताने घोटाळा?

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

अलिबाग तालुक्यातील कनकेश्वर फाटा ते कार्लेखिंड हा मुख्य मार्ग आज पूर्णपणे खड्ड्यांनी व्यापलेला आहे. प्रवासी, वाहनचालक आणि स्थानिक नागरिक त्रस्त झाले आहेत. या मार्गाची अवस्था पाहता तो रस्ता म्हणून ओळखायचा की खड्ड्यांचा पट्टा, असा प्रश्न निर्माण झाला आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून या मार्गाची दुरुस्ती थांबलेली असून, प्रशासन आणि ठेकेदारांनी हात झटकले आहेत. जबाबदाऱ्यांकडून सुरू असलेली ढकलाढकली जनतेचा संताप वाढवते आहे.पावसाळ्याच्या काळात खोल खड्डे आणि दलदलीमुळे प्रवास अशक्य झाला होता. पाऊस ओसरूनही रस्त्याची दुरवस्था सुधारली नाही. उलट



काही ठिकाणी टाकलेली उथळी खडी वाहनचालकांसाठी जीवघेणी ठरते आहे. या रस्त्यावरून दररोज शेकडो दुचाकीस्वार, सायकलस्वार आणि सार्वजनिक वाहतूक करणारी वाहने जीव धोक्यात घालून प्रवास करीत आहेत. रात्री तर हा मार्ग एखादा सापळाच ठरतो. अंधारामुळे खोल खड्डे दिसत नाहीत आणि अपघातांची शक्यता वाढते.विशेष म्हणजे, कनकेश्वर फाटा–कार्लेखिंड हा मार्ग केवळ स्थानिकांसाठीच नव्हे तर पर्यटक व प्रवासी वाहतुकीचा अतिशय महत्त्वाचा दुवा आहे. मुंबई, पुणे, ठाणे आणि बोरीवली येथून येणारे पर्यटक तसेच खासगी बस वाहतूकदेखील या मार्गानेच होते. या पर्यटक वाहतुकीमुळे स्थानिक अर्थकारणाला चालना मिळते, पण सध्याच्या खड्डेमय अवस्थेमुळे केवळ अपघातच नव्हे तर पर्यटनावरही गंडांतर आले आहे. सुरक्षेच्या अभावामुळे प्रवासी रागावले असून, अनेकांनी सोशल मिडियावर प्रशासनावर तीव्र टीका केली आहे.दरम्यान, काही दिवसांत आवास नागेश्वर आणि कनकेश्वर यात्रांचा मोठा सोहळा होणार असून, राज्याच्या विविध भागांतून हजारो भक्त या रस्त्याने येतात. अशा परिस्थितीत ही दुर्दशा यात्रेकरूंच्या सुरक्षिततेला थेट धोका निर्माण करते आहे. ठेकेदारांचा बेजबाबदार कारभार आणि संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांचा पूर्ण निष्क्रिय दृष्टिकोन यावरून भ्रष्ट संगनमताचा संशय निर्माण झाला आहे.जनतेतून जोरदार मागणी होत आहे की मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राज्यपाल आचार्य देवव्रत आणि मुख्य सचिव राजकुमार मीणा यांनी या प्रकरणी त्वरित आणि कठोर कारवाई करावी. ठेकेदार आणि टक्केवारीखोर पुढाऱ्यांवर गुन्हे दाखल करून या भ्रष्ट साखळीचा अंत व्हावा, अशी आवाजातली मागणी स्थानिक स्तरावर घुमते आहे. अन्यथा, लोक रस्त्यावर उतरून थेट आंदोलन करण्याच्या तयारीत आहेत.कनकेश्वर फाटा–कार्लेखिंड मार्गाचा हा प्रश्न केवळ रस्त्याचा नाही तर शासनाच्या उत्तरदायित्वाचा आहे. जनता विचारत आहे.या खड्ड्यांसाठी दोषी कोण आणि जबाबदार कोण?

# तुलाभार कार्यक्रमात विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची मोफत पुस्तके वाटप

**दैनिक युवक आधार**
**प्रशांत तांबोळकर शिरूरआनंतपाळ**

तालुक्यातील येरोळ गावचे सरपंच सतिस सिंदाळकर यांच्या आईने चारधाम यात्रा करुन आल्याबदल त्यांची आई अनुसयाबाई सिंदाळकर यांची तुलाभार करुन लोकसेवा आयोगाची परिक्षा देणाऱ्या विद्यार्थाना एमपीएससी, युपीएससी स्पर्धा परीक्षा तथा सरळ सेवा भरती परीक्षांचे पुस्तके येथील जि.प.प्रशाला व जिजामाता विद्यालयाती विद्यार्थाना मु.अ. मार्फत मोफत वाटप करण्यात आली.

ग्रामीण भागातील विद्यार्थी सुद्धा अधिकारी व्हावेत शिक्षणात त्यांची प्रगती व्हावी या उद्देशाने स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षेची पुस्तके संबंधीत विद्यालयाच्या मु.अ.व प्राचार्यांना सुपूर्द करण्यात आली. ही पुस्तके विद्यार्थ्यांना गावातील विद्यालय व जि.प. प्रशाले मध्ये उपलब्ध होतील व ते स्पर्धा परिक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थाना घरी राहून अभ्यास करू शकतील. त्याच



प्रमाणे विद्यार्थी स्कॅनरच्या माध्यमातून आभासी पद्धतीने पुणे येथील नामवंत क्लासचे ज्ञान घेऊ शकतील.

या प्रसंगी मा.मंत्री आ. संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी या उपक्रमांमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थी नक्की अधिकारी बनतील असा विश्वास व्यक्त केला. यावेळी उद्योजक राजकुमार हैबतपुरे, लातुर जि.प,चे मुख्य बांधकाम अभियंता डी.आर.मुकदम गावातील प्रतीष्टीत नागरिक व शिक्षणप्रेमी विद्यार्थी उपस्थित होते.

# खारघरमध्ये छठपूजा उत्साहात

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

खारघर शहरातील सेक्टर १४ येथील तलावाजवळ भारतीय जनता पक्षाच्या खारघर मंडलाच्या वतीने छठपूजेचे आयोजन मोठ्या उत्साहात करण्यात आले. या धार्मिक सोहळयाला पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती होती.

छठ पूजा हा उत्तर भारतातील एक अत्यंत प्राचीन व पवित्र सण आहे. ही पूजा प्रामुख्याने सूर्यदेव आणि छठमातेच्या आराधनेसाठी केली जाते. सूर्यदेवाला ऊर्जा व आरोग्याचा अधिष्ठाता देव मानले जाते. या दिवशी उपासक उपवास धरून नदी, तलाव किंवा जलाशयाच्या किनारी उभे राहून उदयास्त सूर्याला अर्घ्य अर्पण करतात. हा सण निसर्ग, शुद्धता आणि शिस्तीचा प्रतीक मानला जातो. छठमातेच्या आराधनेनंतर मंडळाच्या वतीने मोठ्या प्रमाणात प्रसादाचे वाटप करण्यात आले. टेकवा प्रसाद, केळी आणि विविध फळांचा समावेश असलेला हा प्रसाद श्रद्धाळूना देण्यात आला.



या प्रसंगी खारघर मंडळ अध्यक्ष प्रवीण पाटील, जिल्हा सचिव ब्रीजेश पटेल, उत्तर भारतीय मोर्चा अध्यक्ष संतोष शर्मा, माजी नगरसेविका हर्षदा उपाध्याय, माजी नगरसेवक नरेश ठाकूर, समीर कदम, युवा मोर्चा अध्यक्ष नितेश पाटील, अमर उपाध्याय, उपाध्यक्ष प्रवीण बेरा, आदित्य हातगे, दीपक ठाकूर, हार्दिक पटेल, मयूर घरत, पप्पू खामकर आणि सिद्धेश खेडकर आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. या सोहळयात परिसरातील नागरिकांनीही मोठ्या संख्येने सहभाग घेत छठमातेची पूजा-अर्चना केली.

# बुधवारपासून कोरल वाडीतील आदिवासी बांधवांचे पनवेल प्रांत कार्यालयासमोर आमरण उपोषण

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील ग्रुप ग्राम पंचायत आपटा हद्दीतील कोरलवाडी येथील संतप्त आदिवासी ग्रामस्थ 29 ऑक्टोबर पासून पनवेल उपविभागीय अधिकाऱ्यांच्या कार्यालयासमोर आमरण उपोषण करणार असल्याचे पत्र पनवेल उपविभागीय अधिकाऱ्यांना देण्यात आले आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे की नवी मुंबईपासून अगदी पंधरावीस किलोमीटरच्या अंतरावर असूनही कोरल वाडीला पिढ्यानपिढ्या रस्ता व पाण्यासारख्या मूलभूत सुविधा उपलब्ध झालेल्या नाहीत. या समस्या दूर करण्यासाठी ग्रामस्थांनी एकत्र येऊन ग्राम संवर्धन सामाजिक संस्था या स्वयंसेवी संस्थेच्या मदतीने व सामाजिक कार्यकर्ते श्री. संतोष ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक निवेदने, मोर्चे, आंदोलन, तसेच आमरण उपोषणापर्यंत लढा दिला. त्यांच्या या संघर्षानंतर तीन वर्षांपूर्वी जलजीवन मिशन योजनेतून पाणीपुरवठा योजना व दोन वर्षांपूर्वी राष्ट्रीय महामार्ग क्र. १७ (तारागाव) ते कोरलवाडी असा रस्ता मंजूर झाला. परंतु आजपर्यंत दोन्ही कामे अपूर्ण असून वाडीतील नागरिक आजही मूलभूत सुविधांपासून वंचित आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांकडे अनेक वेळा तगादा लावल्यानंतर रस्त्याचे काम सुरू केले परंतु हे काम एवढे निकृष्ट दर्जाचे होते की एप्रिल महिन्यात केलेले काम मे २०२५ मध्ये मान्सून पूर्व झालेल्या पावसातच वाहून गेला. या सर्व परिस्थितीमुळे शासनाच्या निधीचा अपव्यय तर झालाच आहे आदिवासींना मात्र मोठ्या गैरसोईला सामोरे जावे लागत असल्याने संतप्त आदिवासींनी प्रशासकीय यंत्रणाचा निषेध नोंदवून १) राष्ट्रीय महामार्ग क्र.१७ (नवीन ६६ तारागाव) ते कोरलवाडी आदिवासी वाडी रस्त्याचे काम वेळ खाऊ व निकृष्ट दर्जाचे होत असताना के.एन. घरत ह्या ठेकेदारांना पाठीशी घालणाऱ्या सार्वजनिक बांधकाम उपविभाग पनवेल च्या उप अभियंतावर सेवा हमी कायद्यांतर्गत तात्काळ कारवाई करण्यात यावी व सदर रस्त्याच्या कामाची व्हिजिलन्स इन्क्वायरी करून रस्त्याचे काम गुणवत्ता पूर्ण करण्यात यावे. २) मागील तीन वर्षापासून खोटी कारणे देत कोरलवाडी च्या जल जीवन मिशन योजने चे काम अपूर्ण ठेवणाऱ्या रा.जी.प. ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग पनवेल च्या उप अभियंत्यांवर कारवाई करून रखडलेले काम तात्काळ पूर्ण करण्यात यावे. ३) दोन वर्षांपूर्वी शासनाच्या कातकरी उत्थान कार्यक्रमांतर्गत कोरलवाडी येथील शिबिरात अर्ज भरलेल्या आदिवासींचे रेशन कार्ड व इतर आवश्यक दस्तावेज अनेक वेळा फेऱ्या मारूनही पुरवठा अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे आज तगायत मिळालेले नाहीत त्यामुळे या विलंबास जबाबदार अधिकारी, कर्मचारी यांचेवर सेवा हमी कायद्यांतर्गत कारवाई करून प्रलंबित रेशन कार्ड, व इतर प्रमाणपत्र तात्काळ वितरित करण्यात यावेत या मागण्यांसाठी ग्राम संवर्धन सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सामाजिक कार्यकर्ते श्री. संतोष ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली बुधवार, दिनांक २९ ऑक्टोबर २०२५ पासून उप विभागीय अधिकारी तथा उप विभागीय दंडाधिकारी पनवेल यांच्या कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषणास बसण्याचा निर्णय घेतला आहे.

# खारघरमधील आदिवासीपाड्यात साडीचोळी आणि फराळ वाटप

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर):**

आदर्श सेवाभावी संस्था आणि ईश फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने खारघरमधील घोळवाडी आदिवासीपाड्यात साडी चोळी, फराळ आणि कंदील वाटप कार्यक्रम नुकताच झाला. या वेळी नवी मुंबई महानगर पालिका समाज विकास विभागाचे समाजसेवक दशरथ गंभीर मार्गदर्शन केले.

या वेळी खारघर पोलीस ठाणे गुन्हे प्रकटी करण विभागाचे पोलीस उपनिरीक्षक सूरज जाधव सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक दिनकर पवार, पोलीस नाईक विष्णू बेंडकुळी, प्रभाग अधिकारी जितेंद्र मढवी, समाजसेविका कीर्ती मेहरा, सामाजिक कार्यकर्ते गणेश पेडामकर, सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष गजानन चव्हाणगौतम गायकवाड आदी उपस्थित होते. दिवाळी सणाचे औचित्य साधून प्रभाग अधिकारी जितेंद्र मढवी यांनी आदर्श सेवा भावी संस्था गेल्या १९ वर्षांपासून आदिवासी बांधवांसोबत दिवाळी साजरी करीत आहे. ही समाधानाची बाब आहे.

संस्थेने उपक्रम कायम सुरू ठेवावे, असे सांगितले. पोलीस उपनिरीक्षक दिनकर पवार यांनीही गरिबीवर मात करून आज स्वतःच्या पायावर उभे आहे ते केवळ शिक्षणामुळे त्यासाठी जीवनात शिक्षण खूप महत्वाचे असल्याचे सांगितले. या वेळी उपस्थित मान्यवारांच्या हस्ते जवळपास सत्तर कुटुंबियांना साडी, चोळी, फराळ, आकाश कंदील आणि मुलांना खाऊ वाटप करण्यात आले.


# रिसॉर्टमधील स्वच्छतागृहात छुप्या कॅमेराने रेकॉर्डींग करणाऱ्याला अटक

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर):**

पनवेल तालुक्यातील एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. फार्महाऊसमध्ये आलेल्या महिला पर्यटकांच्या बाथरूममध्ये गुप्तरीत्या स्पाय कॅमेरा बसवून अश्लील चित्रीकरण केल्याचा प्रकार उघड झाला आहे. या प्रकरणी पोलिसांनी त्वरीत कारवाई करत अरोपी मॅनेजरला अटक केली आहे. ही कारवाई तळोजा पोलीस ठाणे यांच्याकडून करण्यात आली आहे.

तळोजा पोलीस ठाण्यातून मिळालेल्या माहितीनुसार, पनवेलजवळील एका फार्महाऊसमध्ये महिला पर्यटक विश्रांतीसाठी आलेल्या होत्या.

याच दरम्यान त्यांना बाथरूममध्ये लपवलेला कॅमेरा आढळला. महिलांनी त्वरित याची माहिती पोलिसांना दिली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपास केला असता



बाथरूममधील आरशामागे सूक्ष्म आकाराचा स्पाय कॅमेरा बसवलेला आढळून आला. तपासात हा कॅमेरा फार्महाऊसचा मॅनेजरनेच बसविल्याचे समोर आले.

पोलिसांनी मॅनेजरला ताब्यात घेऊन त्याच्याकडील मोबाईल व लॅपटॉप जप्त केले आहेत. त्यामध्ये अनेक महिला पर्यटकांचे चित्रीकरण केलेले व्हिडिओ सापडले असल्याचे प्राथमिक चौकशीत उघड झाले आहे.

आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# मुदखेडमध्ये शेतकऱ्यांचा संताप तहसीलदारांच्या गाडीची तोडफोड

## "जय जवान, जय किसान" घोषणांनी परिसर दणाणला

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी – प्रकाश गवारे**

देवेंद्र फडणवीस सरकारच्या जुलमी कारभाराविरोधात आणि शेतकऱ्यांवरील अन्यायाच्या निषेधार्थ मुदखेड येथे शेतकऱ्यांनी सोमवारी तीव्र आंदोलन छेडले. तहसील कार्यालयासमोर "जय जवान, जय किसान" अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. संतप्त शेतकऱ्यांनी तहसीलदारांच्या गाडीची तोडफोड करत प्रशासनाविरोधात तीव्र संताप व्यक्त केला.शेतकरी साईनाथ पाटील खानसोळे (वासरी) यांनी शेतकऱ्यांचा आक्रोश व्यक्त केल्याने त्यांना अन्यायाने तुरुंगात डांबण्यात आल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. या घटनेचा निषेध म्हणून आंदोलन अधिक आक्रमक झाले. शेतकरी यांनी हे सरकार सांगते आम्ही सरकारी खाद्य लावु व हे सरकार व्यापार्यांच सरकार आहे "फाशी झाली तरी चालेल, पण शेतकऱ्यांवर अन्याय होऊ देणार नाही" अशी घोषणा देत सरकारला खुले आव्हान दिले.

दुष्काळामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न कोसळले असून पिके नष्ट झाल्याने अनेकांच्या घरातील दिवाळी अंधारात गेली आहे. शासनाने जाहीर केलेल्या दुष्काळी आणुदानापासून शेतकरी वंचित राहिल्याने संतापाचा उद्रेक झाला आहे. शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे तात्काळ आर्थिक मदत, पिकविमा रक्कम वाटप आणि त्वरित उपाययोजना राबविण्याची मागणी केली आहे.घटनेनंतर पोलिसांनी शेतकऱ्यांना ताब्यात घेतले असून तहसील परिसरात पोलिसांचा बंदोबस्त वाढवण्यात आला आहे. या अन्यायाच्या विरोधात दि. 28 ऑक्टोबर 2025 रोजी सकाळी 10:00 वाजता तहसील कार्यालय, मुदखेड येथे ठिया आंदोलन आयोजित करण्यात आले आहे. शेतकरी संघटनांनी सर्व शेतकरी बांधवांना एकजुटीने उपस्थित राहून आपल्या हक्कासाठी आवाज उठविण्याचे आवाहन केले आहे.

# ८०० कोटी

### कमावणारा कांतारा महिन्याभरातच ओटीटीवर!




रिषभ शेट्टीचा सिनेमा कांतारा चॅप्टर १ ने जगाभारतील प्रेक्षकांच्या मनात स्थान मिळवले. कांताराचा प्रीक्वेल असलेल्या या सिनेमाचे लेखन, दिग्दर्शन आणि त्यात अभिनयही रिषभ शेट्टीने केला आहे. पण आता कांतारा १ आता ओटीटीवर दिसण्यासाठी सज्ज झाला आहे. रुक्मिणी वसंत, गुलशन देवैया आणि जयराम सारख्या कलाकारांनी या सिनेमात दमदार अभिनय केला आहे.

**कांतारा आता ओटीटीवर दिसणार**

कांतारा १ अगदी अलीकडेच म्हणजे २ ऑक्टोबरला थिएटरला रिलीज झाला होता. पण या सिनेमाच्या थिएटर रिलीजला एक महिन्याहून कमी काळ लोटला आहे. तरीही इतक्या कमी वेळात हा सिनेमा ओटीटीवर दिसण्यासाठी तयार असल्याने आश्चर्य व्यक्त केले आहे.

**कधी आणि कुठे दिसणार?**

कांतारा १ प्राइम व्हीडियोवर ३१ ऑक्टोबरला दिसणार आहे. सोमवारी याची अधिकृत घोषणा झाली आहे. यासोबत सिनेमातील एका महत्त्वाच्या दृश्याचा ट्रेलरही जारी केला आहे. हा सिनेमा तमिळ, तेलुगू आणि मल्याळममध्येही दिसणार आहे.

**हिंदीमध्ये नाही दिसणार?**

या सिनेमाच्या भाषांच्या यादीत हिंदी भाषेचा अभाव होता. त्यामुळे हा सिनेमा हिंदी व्हर्जनमध्ये रिलीज होणार नसल्याची चर्चा रंगली आहे. यावरही अनेकांनी आश्चर्य व्यक्त केले आहे. यावर पोस्टवर एकजण म्हणतो, 'सिनेमा हिंदीमध्ये रिलीज केला तरच जास्त व्यूज मिळतील.' तर एकजण म्हणतो याच्या रिलीजला एक महिना झाला नाही. तर लगेच हा ओटीटीवर दिसणार?

**कशावर बेतला आहे कांतारा १ ?**

कादंब राजवंशावर असलेला हा सिनेमा पंजूर्ली दैव, गुलिगा आणि चावुंडीच्या दंतकथांवर आधारित आहे. २०२२ मध्ये आलेल्या कांताराचा हा सिनेमा प्रीक्वेल आहे.

# मराठी सिनेसृष्टीत सनई चौघडे!

दिवाळी संपताच चाहूल लागते ती लग्नसराईची. मराठी सिनेसृष्टीतही सध्या लग्न आणि साखरपुड्याचे वारे वाहू लागले आहेत. मराठी मालिका आणि सिनेमात दिसलेल्या अभिनेत्रींनी त्यांच्या साखरपुड्याचे फोटो शेयर केले आहेत. या अभिनेत्री आहेत शिवानी नाईक आणि तेजस्विनी लोणारी.










**अभिनेत्री शिवानी नाईकचा साखरपुडा संपन्न**

अप्पी आमची कलेक्टर या मालिकेतून प्रेक्षकांच्या भेटीला आलेली अभिनेत्री शिवानी नाईकचा नुकताच साखरपुडा झाला आहे. शिवानीने अभिनेता अमित रेखीसोबत साखरपुडा केला आहे. या दोघांच्या साखरपुड्याचे फोटो व्हायरल झाले आहेत.अमितही अभिनेता असून 'भाग्य दिले तू मला' या मालिकेत तो दिसला होता. 'सध्या तो पिंगा ग पोरी पिंगा' या मालिकेत दिसतो आहे. अभिनेत्री निवेदिता सराफ यांनी या साखरपुड्याला हजेरी लावली होती. रंगभूमीवर शिवानी आणि अमितची ओळख झाली. पर्पल आणि रेड साडीमध्ये शिवानी खूपच क्यूट दिसत होती.

**अभिनेत्री तेजस्विनी लोणारी हिचा साखरपुडा संपन्न**

बिग बॉसमध्ये झळकलेली अभिनेत्री तेजस्विनी लोणारी हिचा साखरपुडा नुकताच संपन्न झाला. शिवसेना पक्षाचे युवा नेते समाधान सरवणकर हे तेजस्विनीचे भावी पती आहेत. शिवसेना नेते सदा सरवणकर यांचा समाधान हा मुलगा आहे. तेजस्विनीने छापा काटा, चित्तोड की राणी पद्मिनी का जोहूर, गुलदस्ता, दोघात तिसरा आता सगळं विसरा, अफलातून या सिनेमात काम केले आहे. तुझेच मी गीत गात आहे मालिकेतही तेजस्विनीने काम केले आहे. लाल रंगाची साडी आणि हिरव्या बांगड्या तेजस्विनीला स्पेशल लूक देत होत्या.

# या दिवशी असणार बिगबॉसचा शेवटचा एपिसोड?

टेलिव्हिजनचा सगळ्यात लोकप्रिय शो बिग बॉस १९ सध्या फुल फॉर्ममध्ये आहे. या शोमधील उत्कंठा दिवसेंदिवस वाढत चालली आहे. हा शो सुरू होऊन आता नऊ आठवडे झाले आहेत. आता या शोच्या वीकएंडला रोज एक नवीन ड्रामा सुरू असतो. आता या शोबाबत नवीन अपडेट समोर आली आहे. या शोच्या फिनालेबाबत एक नवीन अपडेट समोर आली आहे. यामुळे आता फॅन्सची उत्सुकता अजूनच वाढली आहे. रिपोर्टसनुसार बिग बॉस १९चा ग्रँड फिनाले ७ डिसेंबर २०२५ ला होण्याची शक्यता वर्तवली जाते आहे. अर्थात या तारखेबाबत मेकर्सकडून अजूनही कोणतीही ऑफीशियल घोषणा केली



गेली नाहीये. पण सोशल मिडियावर मात्र या तारखेची जोरदार चर्चा आहे.याशिवाय हा शो अजून दोन आठवडे वाढवला जाऊ शकतो अशीही शक्यता बोलून दाखवली जात आहे. सध्या तरी हा शो अजून ४० दिवस प्रेक्षकांचे मनोरंजन करणार आहे. अशातच प्रश्नचिन्ह उभे राहते की मेकर्स केवळ टास्कच्या माध्यमातून मनोरंजन करणार का? तर यावर असे बोलले जात आहे की, या शोमध्ये आणखी एक वाइल्ड कार्ड एंट्री होऊ शकते. अशी चर्चा आहे की अभिषेक बजाजच्या माजी पत्नीची या शोमध्ये एंट्री होऊ शकते. बिग बॉसच्या १९ व्या सीझनची सुरुवात २४ ऑगस्ट २०२५ ला झाली.

**या वीकएंडला कोण जाणार घराबाहेर?**

यावेळी घरात काहीसे वेगळे घडले आहे. यावेळी बिग बॉसने शिक्षा म्हणून अभिषेक, अशनूर आणि कप्तान सोडून सगळ्या घराला नॉमिनेट केले आहे. तसेच बिग बॉसने घरातल्या सदस्यांच्या वाणसमानात ६० % कपातही केली आहे.



# नॉमिनेशन टास्कमध्ये मोठा ट्विस्ट, घरातील 'हे' स्पर्धक झाले नॉमिनेट; कुणाचा पत्ता होणार कट?

'बिग बॉस १९'मध्ये दिवसेंदिवस नवनवीन ट्विस्ट येत आहेत. या घरातील दोन स्पर्धक बसीर अली आणि नेहाल चुडासमा यांचा प्रवास नुकताच संपला. त्यानंतर आता उर्वरित स्पर्धकांमध्ये ही स्पर्धा सुरू आहे. 'बिग बॉस'चा हा शो जसजसा पुढे जात आहे, तसतसा स्पर्धकांचा खेळ आणखीनच स्पर्धात्मक बनत आहे.

बसीर अली आणि नेहल चुडासमा घरातून बाहेर पडताच या आठवड्यात नवा नॉमिनेशन टास्क पार पडला आणि त्यावेळी बिग बॉसनं अभिषेक बजाज आणि अशनूर कौरला नॉमिनेट केलं. अभिषेक आणि अशनूर यांनी माईकचा वापर न केल्यानं त्यांना 'बिग बॉस'कडून नॉमिनेट करण्यात आलं आणि घरातील स्पर्धकांना त्यासंबंधीचा अंतिम निर्णय देण्याबद्दल सांगण्यात आलं.

घरातील स्पर्धकांची एकमेकांशी सहमती न झाल्यानं त्याबद्दलचा निर्णय घेण्यासाठी कॅप्टन मृदुल तिवारीला सांगितलं गेलं. मात्र, त्यानंही योग्य असा निर्णय घेतला नाही आणि परिणामी अभिषेक व अशनूर नॉमिनेशनपासून वाचले.

या नॉमिनेशन टास्कमध्ये मोठा ट्विस्ट आला, तो म्हणजे अशनूर आणि अभिषेक वगळता सर्व सदस्य नॉमिनेट झाले आहेत.




त्यानुसार आता या आठवड्याच्या नॉमिनेट झालेल्या सदस्यांमध्ये कुनिका सदानंद, नीलम गिरी, मालती चहर, शेहबाज, तान्या मित्तल, अमाल मलिक, प्रणीत मोरे, फरहान भट्ट व गौरव खन्ना यांचा समावेश आहे.

'बिग बॉसच्या १९'व्या या सीझनमध्ये कोण विजेता ठरेल याचा अंदाज करणं आता प्रेक्षकांसाठीही कठीण झालं आहे. कारण- 'बिग बॉस १९'मधील जवळपास सगळेच स्पर्धक उत्तम खेळ खेळत आहेत. तसेच या घरातील सर्वच स्पर्धकांचा प्रेक्षकवर्ग आहे. त्यामुळे त्यांना चाहत्यांचा चांगलाच पाठिंबा मिळत आहे. अशातच आता या आठवड्यात केवळ दोन स्पर्धक सोडता, घरातील सर्व स्पर्धक नॉमिनेट झाले आहेत.

नॉमिनेशनबरोबरच आता 'बिग बॉस'च्या घरात आणखी एक वाइल्ड कार्ड एन्ट्री होणार असल्याच्या चर्चा सुरू आहेत. अर्थात, त्याबद्दल अद्याप वाहिनीकडून कोणती अधिकृत माहिती समोर आलेली नाही.


दरम्यान, आता या आठवड्यात कुनिका, नीलम, मालती, शेहबाज, तान्या, अमाल, प्रणीत, फरहान व गौरव यांपैकी कुणाचा गेम सुधारणार? टास्कमधील खेळानुसार कोण टिकणार? आणि कोण घराबाहेर जाणार? हे जणू घेण्याची सर्व स्पर्धकांना उत्सुकता लागून राहिली आहे.

# 'चंद्रा' ते 'बागी ४'; ऑक्टोबरच्या शेवटच्या आठवड्यात ओटीटीवर प्रदर्शित होणार 'हे' चित्रपट व सीरिज

चित्रपट आणि वेब सीरिजप्रेमींसाठी ऑक्टोबर महिन्यातील शेवटचा आठवडा खूप खास ठरणार आहे. कारण- या आठवड्यात ओटीटीवर एकापेक्षा एक चित्रपट आणि वेब सीरिज प्रदर्शित होत आहेत. त्यामुळे प्रेक्षकांना घरी बसून बॉलीवूड, साऊथ आणि हॉलीवूडमधील ॲक्शन, थ्रिलर, रोमान्स आणि रहस्यमय चित्रपट, सीरिज पाहायला मिळणार आहेत. या यादीत 'बागी ४' ते 'लोका चॅप्टर १ : चंद्रा' या चित्रपटांचा समावेश आहे.

**'इडली कढाई'** – बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातल्यानंतर दाक्षिणात्य अभिनेता धनुष लिखित व दिग्दर्शित 'इडली कढाई' हा चित्रपट आता ओटीटीवर प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटात धनुषने अभिनयसुद्धा केला आहे. या चित्रपटात त्याच्याबरोबर अरुण विजय, सत्यराज, पी. समुथिरकानी,





निथ्या मेनन, शालिनी पांडे असे अनेक कलाकार पाहायला मिळत आहेत. या चित्रपटाची कथा एका अशा व्यक्तीच्या अवतीभोवती फिरते, ज्याचे वडील एक पारंपरिक इडलीचं दुकान चालवत असतात. हा चित्रपट २९ ऑक्टोबरला 'नेटफ्लिक्स'वर प्रदर्शित होणार आहे.

**द विचर सीझन ४** – 'द विचर सीझन ४' हॉलीवूडमधील एक काल्पनिक ड्रामा सीरिज आहे आणि ती लेखक आंद्रेज सपकोव्स्की यांच्या पुस्तकावर आधारित आहे. या सीरिजमध्ये हेनरी कैविल, आन्य चालोत्रा व फ्रेया ॲलन मुख्य भूमिकेत आहेत. ही सीरिज ३० ऑक्टोबरला 'नेटफ्लिक्स'वर प्रदर्शित होणार आहे.

**लोका चॅप्टर १ : चंद्रा** – 'लोका चॅप्टर १ : चंद्रा' हा एक सुपरहिट मल्याळी चित्रपट आहे. या चित्रपटाचं दिग्दर्शन डोमिनिक अरुण यांनी केलं आहे. त्यामध्ये कल्याणी प्रियदर्शनने चंद्रा नावाच्या एका रहस्यमयी महिलेची भूमिका साकारली आहे, जी एका जाळ्यात अडकते. हा चित्रपट ३१ ऑक्टोबरला 'जिओ हॉटस्टार'वर प्रदर्शित होणार आहे.

**बागी ४** – टायगर श्रॉफ, संजय दत्त, सोनम बाजवा व हरनाज संधू यांचा 'बागी ४' हा एक ॲक्शनने भरलेला चित्रपट आहे. या चित्रपटाचं दिग्दर्शन ए. हर्षनं केलं आहे. या चित्रपटाच्या पूर्वीच्या ३ भागांनाही प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळाला होता. त्यामुळे जर हा चित्रपट तुम्ही थिएटरमध्ये पाहिला नसेल, तर तुम्ही हा चित्रपट ३१ ऑक्टोबरपासून 'प्राइम व्हिडीओ'वर घरबसल्या पाहू शकता.

**मारीगल्लू** – देवराज पुजारी लिखित व दिग्दर्शित 'मारीगल्लू' ही एक थ्रिलर कन्नड सीरिज आहे. त्यामध्ये प्रवीण तेजस आणि निनाद हरित्सा यांच्यासह इतरही काही कलाकार पाहायला मिळतात. ३१ ऑक्टोबरपासून हा चित्रपट 'झी ५'वर पाहू शकता.




**मेष** – कर्जाचे काम मार्गी लागेल. आपल्या धंद्यात सुधारणा करा. महिलांनी आजाराकडे दुर्लक्ष करू नये. आध्यात्मिक प्रगती होईल.

**वृषभ** – धंद्यातील प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न कराल. कामगारांची कमी भरून काढता येईल. अहंकार बाजूला सारा. चर्चा सफल होईल.

**मिथुन** – नोकरीत वरिष्ठांना मदत करावी लागेल. नोकर वर्गाला दुखवू नका. धंद्यात मोठे काम मिळवण्याचा प्रयन करा. सहलीचे योग आहेत.

**कर्क** – गुरुतुल्य व्यक्तीची भेट घडेल. तुमचा मुद्दा वरिष्ठांना पटवून देता येईल. चर्चा यशस्वी करू शकाल. प्रकृतीची काळजी घ्यावी.

**सिंह** – जबाबदारीची कामे करावी लागतील. आपले मनस्वास्थ्य ठीक ठेवावे. कुटुंबासमवेत तसेच मित्रमंडळीत वेळ घालवाल.

**कन्या** – आजचा दिवस संमिश्र प्रतिसादाचा आहे. महत्त्वाचे काम करताना घाई करू नका. घरगुती वाद वाढवू नका. प्रतिष्ठा वाढेल.

**तूळ** – आज ठरवलेले काम उद्यावर टाकू नका. बोलताना नम्रता ठेवा. आपणास मोठ्या लोकांचा सहवास लागेल. कामात उत्साह राहील.

**वृश्चिक** – किरकोळ कामे करण्याचा आळस करू नका. तुमच्या कार्याला योग्य दिशेने नेता येईल. इतरांच्या कौतुकास पात्र ठराल.

**धनु** - कुटुंबासमवेत चांगला वेळ घालवाल. घाईघाईत निर्णय घेऊ नये. आठवडाभराचे कामाचे नियोजन करावे. आपला धंदा वाढेल.

**मकर** – व्यवसायात हाती घेतलेले काम पूर्ण कराल. मनावर दडपण येईल. वरिष्ठांची मर्जी राखाल. कौटुंबिक सौख्यात वाढ होईल.

**कुंभ** – आपण प्रयत्नाने यश खेचून आणाल. शब्द जपून वापरावेत. नवीन परिचयापासून सावध राहावे. आर्थिक स्थिती उत्तम राहील.

**मीन** - नवीन योजना मार्गस्थ लागतील. आर्थिक नियोजन यशस्वी ठरेल. घरगुती कामे वाढतील.

# बाळाला ताप आल्यावर करु नका ही कामं; ९९% लोकं करतात चुक

आता थंडीचा ऋतू सुरू होणार आहे. या ऋतूमध्ये बाळं आणि लहान मुलांची काळजी घेणे खूप गरजेचे असते. कारण बदलत्या हवामानामुळे मुलांना संसर्गजन्य आजार होण्याचा धोका असतो. त्यातच सर्दी, खोकला, ताप लहान मुलांना झाल्यास काही गोष्टींकडे लक्ष देणे महत्त्वाचे आहे. मुलांना बरं वाटावं यासाठी पालक अनेकदा नको त्या चुका करतात ज्यामुळे मुलांचे आरोग्य आणखीनच बिघडते.



**थर्मामीटरचा वापर**

बालरोगतज्ञ सांगतात की, अनेकदा बाळाच्या अंगाला स्पर्श करून ताप किती आहे याचा अंदाज लावला जातो. मात्र असे करणे चुकीचे आहे. मुलांचा ताप हा नेहमी थर्मामीटरने तपासावा. यामुळे अचूक तापमान कळते आणि उपचार घेण्यासाठी मदत होते.

**अँटीबायोटिक्स देणे टाळा**

अनेकदा पालक कोणताही विचार न करता घरी असलेली औषधे लहान मुलांना देतात. तसेच अँटीबायोटिक्समुळे ताप कमी होतो असा अनेकांचा समज असतो. मात्र त्याचे लहान मुलांच्या आरोग्यावर दुष्परिणाम होऊ शकतात. त्यामुळे नेहमी बालरोगतज्ञांचा सल्ला घेऊनच बाळाला औषध द्यावे. तसेच बाळाला एकाच वेळी दोन प्रकारची औषधे देणेही घातक ठरू शकते.

**आहार**

बालरोगतज्ञांच्या मते, जर तुमच्या लहान मुलाला खाण्याची इच्छा नसेल तर जबरदस्ती खाऊ घालण्याचा प्रयत्न करू नका. अशा वेळी तुम्ही त्यांना हायड्रेट ठेवण्यासाठी ओआरएस, नारळ पाणी किंवा सूप देऊ शकता. जर बाळ ६ महिन्यांचे किंवा त्यापेक्षा लहान असेल तर केवळ आईचे दूध पुरेसे असते.

**जंक फूड टाळा**

मुलांना ताप आल्यावर त्यांना जंक फूड देणे टाळा. यावेळी मुलं हट्टीपणा करतात पण जंक फूडऐवजी हलके अन्न जसे की, उपीट, खिचडी, सूप द्यावे.

**स्पंजिंग**

ताप आल्यावर बाळांना कोमट पाण्याने स्पंजिंग करावे. यासाठी थंड पाण्याचा वापर करू नये. तसेच केवळ कपाळ नाही तर मान, पोट, पाठ आणि मांड्यांवरही पाण्याची पट्टी ठेवावी.

**कपडे**

यावेळी तुमच्या मुलांना हलके, सुती कपडे घाला. जास्त जाड कापडाने शरीरातील उष्णता लवकर बाहेर पडत नाही. याशिवाय जर मुलांना वारंवार उलट्या, जुलाब, पुरळ, डिहायड्रेशनचा त्रास होत असेल आणि त्यांचा ताप जास्तच असेल तर एकदा डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे.

# जिल्हास्तरीय शैक्षणिक विद्यार्थी गुणगौरव सोहळ्याचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल**

रायगड जिल्हा वैश्य समाज संघ आणि रायगड जिल्हा वैश्य समाज युवक संघ, शिक्षण समिती आयोजित मनोज महादेव आंग्रे पनवेल वैश्य ग्लोबल चॅरिटेबल ट्रस्ट पुरस्कृत जिल्हास्तरीय शैक्षणिक विद्यार्थी गुणगौरव सोहळा 2025 चे आयोजन जेष्ठ नागरिक समाज संघ हॉल ठाणा नाका, पनवेल येथे 30 ऑक्टोबर रोजी सकाळी 11 वाजता करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष अशोक भोपतराव, प्रमुख पाहुणे विलास मनोरे, डॉक्टर संतोष कामेरकर, मीरा आंग्रे, रूपाली तेलवणे असणार आहेत. प्रमुख वक्ते कृष्णा म्हस्कर, डॉक्टर अजय चौगुले आहेत. या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# चार चाकी कार गेली नाल्यात

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

चार चाकी कार नाल्यात कोसळल्याची घटना 26 ऑक्टोबर रोजी संध्याकाळी साडेसहाच्या सुमारास घडली. सुदैवाने यात कोणतेही जीवित हानी झाली नाही. मात्र कारचे नुकसान झाले.

रविवार 26 ऑक्टोबर रोजी मोठ्या प्रमाणात पाऊस कोसळत होता. वीज देखील गायब झाली होती. याच दरम्यान शांतीवनकडून पनवेलच्या दिशेने वेगाने एक चार चाकी कार जात होती. यावेळी महिलेचे कारवरील नियंत्रण सुटले आणि चार चाकी कार थेट नाल्यात जाऊन कोसळली. नेरे स्टॉप वर संध्याकाळच्या सुमारास मोठ्या प्रमाणात गर्दी असते. वेगाने आलेली कार नाल्यात कोसळल्याने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र तीच कार वेगाने बस



स्टॅन्ड जवळील नागरिकांना धडकली असती तर मोठी दुर्घटना घडली असती. सुदैवाने असा कोणताही प्रकार झाला नाही. कार नाल्यात कोसळल्याने कारचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. यावेळी घटनास्थळी पोलीस उपस्थित होते.

# महावितरणची नवी ऊर्जा: 'ग्राहक देवो भव:' साठी मनुष्यबळात क्रांती

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी ज्योत्सना करवाडे**

**नागपूर :** महावितरणने नुकतीच लागू केलेली सुधारित मनुष्यबळ पुनर्रचना केवळ कर्मचाऱ्यांसाठीच नव्हे, तर 'ग्राहक देवो भव:' या तत्त्वानुसार प्रत्येक वीज ग्राहकाला समर्पित, जलद आणि उत्कृष्ट सेवा देण्यासाठीच आहे, असे स्पष्ट मत महावितरणचे संचालक (संचलन तथा प्रकल्प) सचिन तालेवार यांनी व्यक्त केले.

सोमवारी (दि. 27) नागपूर येथील महावितरणच्या विद्युत भवन मुख्यालयात आयोजित बैठकीत ते बोलत होते. नागपूर परिमंडळात मागील दोन आठवड्यांपासून लागू असलेल्या या मनुष्यबळ पुनर्रचनेचा सखोल आढावा घेण्यासाठी या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

**कामाचा ताण कमी, सेवेचा दर्जा वाढणार!**



यावेळी तालेवार यांनी पुनर्रचनेचे उद्दिष्ट स्पष्ट केले की, "यापूर्वी वीज अभियंते आणि तांत्रिक कर्मचाऱ्यांवर वीजपुरवठा, वीजबिल वसुली अशा अनेक कामांचा मोठा ताण होता. नव्या पुनर्रचनेत कामाचा हा ताण कमी करून कर्मचाऱ्यांवर निवडक आणि केंद्रित स्वरूपाच्या कामांची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. यामुळे कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वाढेल आणि याचा थेट सकारात्मक परिणाम ग्राहकांना मिळणाऱ्या दर्जेदार सेवेवर होईल."

**ग्राहकांच्या अपेक्षा पूर्ण करा: व्यावसायिक दृष्टिकोन महत्त्वाचा**

संचालक तालेवार यांनी यावेळी कर्मचाऱ्यांना बदल मनापासून स्वीकारण्याचे आवाहन केले. ते म्हणाले, "ग्राहकांना महावितरणकडून उत्तम सेवेची खूप अपेक्षा आहे. या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी कर्मचाऱ्यांनी सेवेप्रती व्यावसायिक दृष्टिकोन बाळगणे आवश्यक आहे. बदलत्या तंत्रज्ञानाचा पुरेपूर वापर करा, तक्रारींचा निपटारा वेळेत करा आणि वसुलीचे लक्ष्य शंभर टक्के गाठा."

**बदल अधिक ग्राहक-केंद्री करण्यासाठी सूचना द्या!**

महावितरणने पुनर्रचनेचे प्रारूप लागू करताना ते अधिकाधिक प्रभावी कसे होईल यावर भर दिला आहे. तालेवार यांनी या बदलांच्या अंमलबजावणी दरम्यान येणाऱ्या पारिस्थितिनुसार दुरुस्ती करण्याची तयारी दर्शवली.

त्यांनी यावेळी कर्मचारी आणि अधिकारी वर्गाला आवाहन केले की, "पुनर्रचना अधिकाधिक ग्राहक केंद्रित होण्यासाठी आपल्याला बदल आवश्यक वाटत असल्यास, त्याची निकड आणि कारण स्पष्ट करून तुमच्या सूचना जरूर द्या."

या बैठकीला नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता दिलीप दोडके, अधीक्षक अभियंता अमित परांजपे, संजय वाकडे, मंगेश वैद्य आणि स्मीता पारखी यांचेसह नागपूर परिमंडलातील सर्व कार्यकारी अभियंते उपस्थित होते.

**रौशनी फाऊंडेशनतर्फे नेत्रदानाविषयी मार्गदर्शन**

निवृत्त वीज कर्मचा-यांनी नेत्रदानाविषयी जनजागृती करण्यासाठी स्थापित रौशनी फाऊंडेशनचे राजेंद्र जैन यांनी यावेळी मारणोपरांत नेत्रदानाचा उद्देश आणि कार्य याबाबत माहिती दिली. तसेच नेत्रदानाची आवश्यकता व महत्व सांगून मरणोपरांत नेत्रदान करण्याचे आवाहन केले.

जास्तीतजास्त लोकांनी मरणोपरांत नेत्रदान करुन नेत्रहीन व्यक्तींचे जीवन सुकर करण्याचे आवाहन संचालक सचिन तालेवार यांनी यावेळी केले.

# डॉ. शुभम सागडे पाटील यांचा सत्कार



**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी शिरुरआनंतपाळ**

तालुक्यातील येरोळ येथील प्राथमीक आरोग्य केंद्रातील वैद्यकिय अधिकाऱ्याची बदली झाल्यामुळे त्यांच्या रिक्त जाग्यावर इएचशी ऑर्मी हॉस्पीटल लातुर येथुन डॉ. शुभम सागडे पाटील हे नव्याने रुजु झाल्याने त्यांचा येरोळ येथील ग्रा.पं.चे सरपंच सतिस सिंदाळकर यांच्या हस्ते शालश्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

येरोळ येथील प्राथमीक आरोग्य केंद्राअर्तगत आठ्ठावीस गाव असुन येथे दररोज दोनशे आडीचशे ओपीडी होत आहे. गोरगरिबासाठी चांगली सेवा मिळत असल्याने आजारी रुग्नांची उपचारासाठी संख्या वाढली आहे. नुकत्तेच रिक्त झालेल्या जाग्यावर डॉ.शुभम सारडे हे आल्याने त्यांचा सन्मान करण्यात आला. डॉ.सारडे म्हणाले की येरोळ व परिसरातील रुग्नांनी खाजगी दवान्यात न दाखवीता आपण शासनाच्या दवाखाण्यात उपचार घ्यावा. त्यांच्या आजाराचे निश्चीत निदन करुन उपचार केले जाणार असल्याचे सांगितले. यावेळी विश्वनाथ साकोळकर, बाबुराव वाघमारे, फार्मारिष्ट महारुद्र बिरादार, जेष्ट पत्रकार ओमप्रकाश तांबोळकर व प्राथमीक आरोग्य केंद्रातील आरोग्य कर्मचारी उपस्थित होते.

# भारतीय नौदलाच्या नौदल उरण येथे मोफत वैदकीय शिबीर संपन्न

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी**

भारतीय नौदलाच्या नौदल सप्ताह 2025 चा भाग म्हणून, आयएनएचएस संधानी आणि नौदल स्टेशन करंजा यांच्या वतीने सोमवार दि.२७ रोजी उरण एज्युकेशन सोसायटी इंग्लिश स्कूल, पालक मैदान येथे एकभव्य आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते .

या शिबिरात उरण आणि पंचक्रोशितील नागरिकांना आवश्यक आरोग्य सेवा आणि व आरोग्यविषयक सल्ला देण्यात आला,त्यामुळे स्थानिक नागरिकांना सुलभ आणि उच्च दर्जाची वैद्यकीय सेवा मिळाली.

या शिबिराचे उद्घाटन वेस्टर्न नेव्हल कमांडचे कमांड मेडिकल ऑफिसर सर्जन रिअर ॲडमिरल के. एम. अधिकारी यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी कारंजा येथील वरिष्ठ अधिकारी कमोडोर व्ही. एम. डी. जगन्नाथ; उरण




एज्युकेशन सोसायटी (यूईएस) चे अध्यक्ष आणि विश्वस्त; आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

या शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.असून या शिबिरांतर्गत सुमारे 400 पेक्षा अधिक नागरिकांनी .लाभ घेतला.या शिबिरात . डॉक्टर, शल्यचिकित्सक, स्त्रीरोगतज्ज्ञ, बालरोगतज्ज्ञ, ईएनटी तज्ञ, नेत्रतज्ज्ञ, दंतवैद्य, त्वचारोगतज्ज्ञ, फिजिओथेरपिस्ट, आहारतज्ज्ञ आणि मानसशास्त्रीय सल्लागार अशा तज्ञ डॉक्टरांच्या वतीने आरोग्य तपासणी करून विशेष मोलाचे मार्गदर्शन केले. तज्ञांच्या सल्ला व्यतिरिक्त, या शिबिरात नागरिकांना तपासून मोफत औषधे देण्यांत आली वितरण आणि त्याच प्रमाणे रक्त तपासणीसह आवश्यक मोफत सेवा देखील देण्यात आल्या

# जि. प.सिपोरा अंभोरा सर्कल मधून संधी दिल्यास भाजप पक्षाचा झेंडा फडकेल-सौ. भारती गोफणे

**दैनिक युवक आधार**
**जाफराबाद टेंभूर्णी प्रतिनिधी - अनिल ससाने**

: जालना जिल्हा जाफराबाद तालुक्यातील सिपोरा आंभोरा गटातून उच्चशिक्षित महिला सरपंच भातोडी यांना भाजप पक्षाने संधी दिल्यास गाव विकासाप्रमाणे जिल्हा परिषद गटाचा विकास केल्याशिवाय राहणार नाही भाजप पक्षाचे नेते माननीय केंद्रीय रेल्वेमंत्री रावसाहेब पाटील दानवे दादा पंचायतराज अध्यक्ष आमदार माननीय संतोष भाऊ दानवे जिल्हा परिषद सदस्य शालीकराव पाटील मस्के साहेब जिल्हा परिषद सदस्य राजेश पाटील चव्हाण पंचायत समिती सदस्य मधुकर गाडे साहेब भाजपा तालुका अध्यक्ष नाना भागिले टेंभुर्णी मंडळाध्यक्ष मनोज शिंदे भाजपा युवा मोर्चाचे विजय



परिहार या सर्वांनी जर मला जिल्हा परिषद शिपोरा साठी संधी दिल्यास मी नक्कीच सर्कलचा विकास करून भाजप पक्षाचा झेंडा फडकवल्याशिवाय राहणार नाही शेवटी पक्षाची जबाबदारी माझ्यासाठी सर्वश्रेष्ठ असेल असे मत सरपंच भारती मधुकर गोफणे भातोडी यांनी व्यक्त केले.



**मनोगत**

**मी अरुण रामेश्वर भोरे असे व्यक्त करतो की सरपंच भारती मधुकर गोफणे यांना भातोडी गावाचा विकास कामाच्या माध्यमातून चेहरामोहरा बदललाआहे पक्षाने जिल्हा परिषद शिपोरा सर्कल मधून संधी द्यावी संधी दिल्यास सर्कलचा विकास झाल्याशिवाय राहणार नाही .**

**अरुण भोरे उपसरपंच**
**भातोडी तालुका जाफराबाद जिल्हा जालना**

# उसने दिलेले पैसे परत न केल्याने महिलेची केली हत्या

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

उसने दिलेले 40 हजार परत न केल्याने कुंडेवहाळ येथील महिलेची हत्या करणाऱ्या आरोपीला पनवेल शहर पोलिसांनी अटक केली. मोहम्मद समीर अलाउद्दीन अंसारी (डेअरी चालक, राहणार कुंडे वहाळ) असे आरोपीचे नाव आहे.

24 ऑक्टोबर रोजी पनवेल तालुक्यातील कुंडेवहाळ येथील महिला संगीता नामदेव म्हात्रे यांची गळा आवळून अज्ञाताने हत्या केली आणि त्यांच्या कडील सोन्याचे दागिने चोरून नेले. गुन्हा दाखल झाल्यानंतर महिला पोलीस पथकाने या गुन्ह्याचा सखोल तपास केला. तांत्रिक विश्लेषणाचा आधार घेऊन आरोपी मोहम्मद समीर अलाउद्दीन अन्सारी याला अटक केली. यावेळी त्याच्याकडे केलेल्या



तपासा दरम्यान त्याने मयत महिलेस चाळीस हजार रुपये उसने दिले होते. हे पैसे परत मिळण्यासाठी त्याने वारंवार मागणी केली.

मात्र ही रक्कम मागण्याकरता तो घरी गला असता महिलेने पैसे परत करण्यासाठी नकार दिला.

त्यामुळे आरोपीने संगीता नामदेव म्हात्रे याची गळा आवळून हत्या केली आणि तिच्याकडील दागिने चोरून नेले.

# गावदेवी चॅरिटेबल शेतकरी संघटना वर्धापन दिन साजरा!

**दैनिक युवक आधार**
**मुंबई प्रतिनीधी (सतिश पाटील)**

गावदेवी चॅरिटेबल संघटना( दिवे अंजुर भिवंडी ) ही गेली सात वर्ष अनेक उपक्रम राबवित आहेत. भूमिपुत्रांना न्याय मिळावा यासाठी सतत कायदेशीर लढणारी संघटना. बुलेट ट्रेन प्रकल्पात भूमिपुत्रांना योग्य मोबदला मिळवून दिला. कोरोना काळात कम्युनिटी किचन द्वारे दररोज तीन चारशे लोकांना जेवण वाटप केले होते. अलिबाग कॉरिडॉर संदर्भात सरकारी कार्यालयात सतत पाठपुरावा सुरू आहे यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन दिले आहे. गावातील भूदान जमीन संदर्भात कायदेशीर प्रक्रिया सुरू आहे. दि.बा. पाटील साहेब विमानतळ नामकरण आंदोलन असो टोरंट विरोधात आंदोलन असो एम एम आर डी तोडक कारवाई असो.भ्रष्टाचार विरोधात कार्य असो,रस्त्यांची समस्या याबाबत वेळोवेळी कागदोपत्री नोंद घेऊन जनतेला न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करीत असतात.

अनेक प्रश्न संघटने मार्फत पार पाडत आहेत. जिथे अन्याय तिथे न्याय मिळवून देण्यासाठी संघटना कार्य करीत आहे. गावाचा आणि



समाजाचा सर्वांगीण विकास हा संघटनेचा ध्यास आहे.यासाठी संघटनेचे अध्यक्ष ,उपाध्यक्ष तसेच सभासद वेळ पडल्यास स्वखर्चाने मदत करीत असतात. संघटनेचे पुढील स्वप्न व प्रयास आहे फक्त दिवे अंजुर, भिवंडी पर्यंत मर्यादित समाज कार्य न करता सर्व पंचक्रोशीत संघटनेची शाखा बनवून कार्यभार वाढवण्याचा मानस आहे प्रत्येक गावाची विकास हा ध्यास आहे.

आज गावाबाहेरील समाजकार्य करणारे मंडळातील प्रतीनीधी यांना निमंत्रित केले होते होते प्रत्येकाने आपले आपली अडचण व मत मांडण्याचा प्रयत्न केला. तसेच संघटने कडून आलेल्या पाहूण्यांचा सन्मानचिन्ह, शाल,पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

त्यात हुशार विद्यार्थी, वकील, डॉक्टर, समाज सेवक, सैनिक,पत्रकार असे उपस्थित होते.

तसेच महीला बचत गट यांना मिक्सरग्रॉन्डर भेट देण्यात आले.तसेच दिव्यांग व्यक्तींना भेट वस्तू देऊन सन्मानित करण्यात आले.

# मराठा समाजाच्या वतीने मी खासदार झालो, पैसे आले तरी माणसे दूर होऊ नये; :धैर्यशील पाटील (खासदार )

## मराठा समाज भवनाच्या पहिल्या मजल्याचे उद्घाटन

**दैनिक युवक आधार**
**पेण : दीपक लोक**

मराठा समाजाच्या वतीने मी राज्य सभा खासदार झालो त्यामुळे माझा सत्कार व अभिनंदन केले परंतु मी मानेन मला आशीर्वाद दिला हे योग्य ठरेल साधारण 50 वर्षा पूर्वी राजकारणात आपला एक माणूस मोठा करायचा या पद्धतीने मोठी लढाई करावी लागली खिशात दिडकी सुद्धा नसताना ज्या मंडळीनी व वाडवडिलांनी माझ्या वडिलांना साथ दिली त्या वडीलधाऱ्यानी मला शुभ आशीर्वाद दिले हे माझ्या वडिलांनीच मला आशिर्वाद दिले असे मानेन.

सध्या राजकारण घातक झालाय कोण कधी मोठा होईल किंवा कोण कधी खाली येईल हे सांगता येत नाही राजकारण आणि सिनेमा यांच्या त काही फरक नाही राजकारणात सुद्धा पिक्चर हाऊसफुल झाला तर नको ते जवळ येतात जर




पिक्चर आपटला तर समाजात किंमत कमी होते अशी चुकीची रील समाजात पसरली आहे मी देवाकडे प्रार्थना हेच करेन उंची किती वाढली आणि चेहरा ढगाच्या वर गेला तरी पाय इथल्या मातीवर राहू दे राजकारणात सर्वात महत्वाची प्रॉपर्टी म्हणजे माणसे पैसे आले तरी माणसे दुर होउ नये असे उदगार राज्यसभा खासदार धैर्यशील पाटील यांनी उद्घाटन प्रसंगी व्यक्त केले.

पेण येथील मराठा समाज भवन यांच्या पहिल्या मजल्याचे उद्घाटन सोहळा राज्यसभा खासदार धैर्यशील पाटील, जेएसडब्ल्यू फाऊंडेशन अधिकारी सुधीर तेलॉग, प्रकाश झावरे, रघुनाथ दळवी, भाऊ यरणकर, कृषि उत्पन्न समितीचे सभापती महादेव मानकर, मंगेश दळवी, बाळाराम पाटील, राजेंद्र वारकर, गणपत पार्टे, सदाशिव पवार, यांच्या हस्ते फित कापून झाले यावेळी मराठा समाजाच्या अध्यक्ष पी टी शिंदे, जेष्ठ मंडळी, युवा ,तरुण महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

समाजातील प्रत्येक माणसानी सहकार्य केल्याने आज मराठा समाज भवनाचे सर्वांच्या शुभ आशीर्वादाने सूंदर वास्तू उभी राहिली आहे असे यावेळी खासदार धैर्यशील पाटील यांनी केले

# पनवेल मनपातर्फे गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये तपासणी; अग्निशमन यंत्रणेचे नव्याने सर्वेक्षण

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर) :**

पनवेलमधील हजारो गृहनिर्माण सोसायट्या अग्निसुरक्षा यंत्रणेकडे दुर्लक्ष करत आहेत. बहुतांश सोसायट्यांमध्ये आग प्रतिबंधक व्यवस्था बंद किंवा अपुरी असल्याने आणीबाणीच्या परिस्थितीत मोठा धोका निर्माण होत असल्याचे पालिकेच्या अहवालात अधोरेखित करण्यात आले आहे. या यंत्रणेचे नव्याने सर्वेक्षण होणार आहे.

मागील आठवडाभरात पनवेलमध्ये तीन आगीच्या घटना घडल्या आहेत. या तीन घटनात तीन जणांचा दुर्देवी मृत्यू झाला. या तीनही घटनांमध्ये घटनास्थळी कोणतीही अग्निशमन यंत्रणा नसल्याने तत्काळ मदत मिळू शकली नसल्याने आग पसरली. दरम्यान, अग्निशमन यंत्रणेबाबत नागरिकांमध्ये उदासीनता असल्याचे समोर आले असुन पनवेल महानगरपालिका परिसरातसह तालुक्यात हजारो सोसायट्यांची अग्निशमन यंत्रणा बंद असल्याची माहिती समोर आली आहे. हजारों गृहनिर्माण सोसायट्यांपैकी केवळ ३४२ सोसायट्यांनी अग्निशमन विभागाकडे आवश्यक 'फॉर्म बी' सादर करून त्यांच्याकडील फायर सिस्टीम कार्यरत असल्याचे निश्चित केले होते. ही माहिती मे महिन्यातील असली तरी पालिकेने वारंवार लागणाऱ्या आगीच्या घटना लक्षात घेता पालिका हद्दीत सर्वेक्षणाला सुरुवात केली आहे. याबाबत पनवेल महानगरपालिकेचे मुख्य अग्निशमन अधिकारी प्रवीण बोडके यांनी याबाबत जनप्रबोधनाची गरज असल्याचे सांगितले. आग लागल्यास आपल्या सोसायटीत ती विझविण्यासाठी सक्षम यंत्रणा असावी. आग लागू नये यासाठी प्रतिबंध महत्त्वाचा असल्याचे बोडके म्हणाले. रहिवाशांनी आपल्या सोसायटीत अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित करणे गरजेचे आहे. विशेष म्हणजे याकरिता जनजागृती मोहीमदेखील राबवावी. आमच्याकडे रहिवाशांनी विनंती केल्यास आम्हीदेखील सोसायटीमध्ये येऊन अग्निशमन यंत्रणेबाबत सोसायटीत येऊन जनजागृती करू, असे पनवेल मनपा मुख्य अग्निशमन अधिकारी प्रवीण बोडके यांनी सांगितले.